**उद्या अंक नाही**



*अनंत चतुर्दशीनिमित्त आज दै. वृत्तमानस कार्यालयास सुट्टी असल्यामुळे उद्याचा अंक प्रकाशित होणार नाही, याची सर्व वाचक- जाहिरातदार व वितरकांनी नोंद घ्यावी.*

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

*मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.*
***दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स***
*भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३*

Email : vrittamanas1@gmail. com | मुंबई/ पालघर | मुंबई, मंगळवार, १७ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ८८ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये




# विरोधकांनी केलेल्या टीकेकडे लक्ष देत नाही!

## मी सरदारांच्या भूमीत जन्मलेला मुलगा...

**प्रतिनिधी**
**अहमदाबाद**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिल्या 100 दिवसांचा हिशेब जनतेसमोर मांडला. यावेळी ते म्हणाले, या काळात आपली प्रचंड खिल्ली उडवली गेली, चेष्टा केली गेली, अपमानित केले गेले. मात्र आपण लक्ष्य साध्य करण्यासाठी सातत्याने कार्यरत होतो. यामुळे सर्व काही शांतपणे सहन करत होतो. ते अहमदाबादमध्ये विविध विकास कामांच्या शुभारंभ आणि लोकार्पणासाठी आयोजित कार्यक्रमावेळी बोलत होते.

**_100 दिवसांत 15 लाख कोटींहून अधिक योजनांवर काम_**
*100 दिवसांत 15 लाख कोटींहून अधिक योजनांवर काम सुरू झाले आहे. 3 कोटी कुटुंबांना घरे देण्याच्या योजनेवर वेगाने काम सुरु आहे. 70 वर्षांवरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना 5 लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची हमी पूर्ण करण्यात आली आहे. या 100 दिवसांत तरुणांच्या रोजगारासाठी मोठे निर्णय घेण्यात आले. तरुणांसाठी 2 लाख कोटी रुपयांचे विशेष पीएम पॅकेज जाहीर करण्यात आले. याचा फायदा 4 कोटींहून अधिक तरुणांना होणार आहे. आता कंपनीत पहिल्या नोकरीची पहिली सॅलरीही सरकार देईल. तिसऱ्या टर्मच्या पहिल्या 100 दिवसांत गुजरातसह संपूर्ण देशात 11 लाख नवीन लखपती दिदी तयार झाल्या आहेत, अशी माहिती पंतप्रधान मोदी यांनी दिली.*

पंतप्रधान मोदी म्हणाले, देशातील जनतेने 60 वर्षांनंतर एक नवा इतिहास रचला आहे. एका सरकारला सलग तिसऱ्यांदा देशाची सेवा करण्याची संधी दिली आहे. ही भारताच्या लोकशाहीतील एक मोठी घटना आहे. मी निवडणूक काळात देशातील जनतेला गॅरंटी दिली होती की, सरकारच्या तिसऱ्या टर्मच्या पहिल्या 100 दिवसांत देशासाठी अभूतपूर्व निर्णय घेण्यात येतील. गेल्या 100 दिवसांत मी दिवस-रात्र बघितली नाही. 100 दिवसांचा अजेंडा पूर्ण करण्यासाठी संपूर्ण ताकद झोकून दिली. देशात असो वा परदेशात जेथे जे प्रयत्न करायचे होते, ते केले. कुठलीही कसर बाकी ठेवली नाही.

मोदी म्हणाले, "गेली 100 दिवस विरोधक काय काय बोलले, हे आपण बघितले आहे. माझी खिल्ली उडवली गेली. विविध प्रकारचे तर्क वितर्क दिले गेले, मजा उडवली गेली. एवढे होऊनही मोदी गप्प का? असा प्रश्न अनेकांना पडला होता. एवढी खिल्ली उडवली जात होती. अपमान केला जात आहे. पण, माझ्या गुजराती बंधू-भगिनींनो हा सरदार पटेलांच्या भूमीत जन्माला आलेला मुलगा आहे. सर्व प्रकारच्या खिल्ल्या आणि अपमान सहन करत, एक प्रण करत 100 दिवसांत आपल्या कल्याणासाठी धोरणे बनवण्यात आणि तुमच्या कल्याणाचे निर्णय घेण्यात व्यस्त राहिलो. ज्यांना ज्या पद्धतीने खिल्ली उडवायची आहे, उडवा. त्यांना पण तर आनंद वाटावा. घ्या... मी कसल्याही प्रकारचे उत्तर द्यायचे नाही, हे निश्चित केले होते."



## 'प्रभादेवीचा राजा'च्या अंगणात कृष्ण जन्माची लीला

मुंबई : कामगार विभागात सामाजिक,शैक्षणिक आणि क्रीडा चळवळीचे प्रेरणास्थान बनलेला बाप्पा 'प्रभादेवीचा राजा' यंदा आपले ८९वे वर्ष साजरे करीत आहे. त्यानिमित्ताने प्रभादेवी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने यंदा भगवान श्रीकृष्ण जन्माचा भव्य देखावा चलत्चित्राद्धारे सादर केला आहे. हा देखावा पाहण्यासाठी आणि बाप्पाच्या दर्शनासाठी गणेशभक्तांची मोठी गर्दी होत आहे. या गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष माजी नगरसेवक समाधान सरवणकर असून सचिवपदाची धुरा चेतन राणे वाहत आहेत.

छाया - अनिल पानस्कर

# जरांगेंचा बोलविता धनी कोण, हे शोधावं लागेल- फडणवीस



**प्रतिनिधी**
**पुणे**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे मराठवाडा मुक्ती दिनापासून (मध्यरात्रीपासून) पुन्हा एकदा उपोषणाला बसत आहेत. त्यांना कोण उपोषणाला बसवत आहे हे तुम्ही त्यांनाच विचारलं पाहिजे, असे सांगत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनोज जरांगे यांचा बोलविता धनी कोण, असाच सवाल उपस्थित केला आहे.

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे हे 29 सप्टेंबर पासून आमरण उपोषण करणार होते. मात्र त्याआधीच अनंत चतुर्दशी आणि मराठवाड्यासाठी महत्त्वाचा दिवस असलेल्या मराठवाडा मुक्ती संग्रामापासून आमरण उपोषण सुरु करणार आहेत. मराठा समाजाला ओबीसीमधून सरसकट आरक्षण आणि सगेसोयरेचे कायद्यात रुपांतर करण्याची त्यांची मागणी आहे. फडणवीस यांच्यामुळे मराठा समाजाचे आरक्षण रखडले असल्याचा त्यांचा आरोप आहे. त्यामुळे त्यांना वारंवार उपोषणाला कोण बसवत आहे, असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले की, काल या संदर्भात मुख्यमंत्र्यांसोबत बैठक झाली आहे. धनगर समाजाला आरक्षण देण्याचा रोडमॅप मुख्यमंत्र्यांनी तयार केला आहे. सरकार सकारात्मक आहे. जरांगेंना उपोषणाला कोण बसवत आहे त्याचे उत्तर तुम्ही त्यांनाच विचारा आणि आम्हीही शोधू, असं फडणवीस म्हणाले.

# महामंडळांचा प्रसाद फक्त शिंदे सेनेलाच?

## शिरसाटांकडे 'सिडको' तर हेमंत पाटलांचंही पुनर्वसन

**प्रतिनिधी**
**मुंबई**

शिंदे शिवसेनेत महामंडळाचे वाटप सुरू झाले आहे. शिंदे सेनेतील नाराज आमदारांना महामंडाळांचं वाटप करण्यात येत असल्याचे समोर आले आहे. नाराज आमदारांचे राजकीय पुनर्वसन करण्याचा हा प्रयत्न असल्याची चर्चा आता रंगत आहे. मात्र दुसरीकडे अजित पवारांच्या राष्ट्रवादीला एकही महामंडळ का नाही? असा सवाल उपस्थित होत आहे.

महामंडळांमध्ये सिडकोच्या अध्यक्षपदी संजय शिरसाट यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर आमदार सदा सरवणकर हे सिद्धिविनायक न्यासाचे ट्रस्टी म्हणून काम पाहणार आहेत. तसेच आनंदराव अडसूळ यांना एससी- एनटी महामंडळाचं अध्यक्षपद देण्यात आले आहे. तर माजी खासदार हेमंत पाटलांचे राजकीय पुनर्वसन करण्यात आल्याचे समोर आले आहे. पाटील यांना राज्यमंत्रीपदाचा दर्जा देण्यात आला असून त्यांची बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# देशातील चांगल्या-वाईटासाठी हिंदूच जबाबदार - भागवत

**अलवर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सरसंघचालक डॉ. मोहन भागवत राजस्थानात म्हणाले, देशात काही चांगले घडले तर हिंदू समाजाची कीर्ती वाढते. काही चूक झाली तर त्याची जबाबदारीही हिंदू समाजावर येते, कारण ते या देशाचे कर्तेधर्ते आहेत.

हिंदू धर्माची व्याख्या सांगतांना ते म्हणाले, ज्याला आपण हिंदू धर्म म्हणतो तो खरा मानवधर्म आहे. हा जागतिक धर्म आहे आणि तो सर्वांच्या कल्याणाची इच्छा करतो. कौटुंबिक मूल्यांबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली. देशात कौटुंबिक मूल्ये धोक्यात आहेत. माध्यमांच्या गैरवापरामुळे नवी पिढी आपली मूल्ये झपाट्याने विसरत चालली आहे. तो चिंतेचा विषय आहे.

मोहन भागवत 5 दिवसांच्या अलवर दौऱ्यावर आहेत. शहर संचलन कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी इंदिरा गांधी स्टेडियममध्ये स्वयंसेवकांना संबोधित केले. ते म्हणाले, पुढील वर्षी संघ आपल्या स्थापनेला 100 वर्षे पूर्ण करेल. संघाची कार्यपद्धती प्रदीर्घ काळापासून चालत आलेली आहे. आपल्याला देशाला प्रबळ करायचे आहे. त्यासाठी हिंदूसह सर्व समाजाचे पाठबळ मिळाले पाहिजे आणि ते मिळविण्यात आपण यशस्वी ठरु.




**मुंबई:** हेल्पिंग हँड चैरिटेबल ट्रस्ट चे मनोज यादव यांच्या प्रयत्नांनी आणि "लॉज मदर इंडिया 110" या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने वार्ड 58, गोरेगाव राम मंदिर रोड मधील आणखी 3 बालवाड्यांचे फ्लोअर टाइलिंग" चे काम पूर्ण केले. यावेळी अंगणवाडी सेविकांनी संस्थेच्या डॉ चेतन अरोरा, मौलिक भाटू, राजीव दमानी आणि सुदीप मौलिक यांचा सत्कार करून आभार मानले.



# वसई तालुक्यातील स्वच्छतागृहे डबघाईला

## हगणदारी मुक्त संकल्पनेचा फज्जा; पालिका उदासीन

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई -विरार शहर महानगरपालिकेने शहर स्वच्छ अभियानासाठी हगणदारी मुक्त या शासकीय योजनेच्या माध्यमातून गोरगरीबांना शौचालये बांधून दिली. सार्वजनिक ठिकाणी नागरिकांना, पादचाऱ्यांना सहज वापरता येतील अशी स्वच्छतागृहे बांधली. मात्र सध्यस्थितीत देखभालीअभावी ही स्वच्छतागृहे डबघाईला आली असून तेथे अस्वच्छतेचा बोजवारा उडाल्याचे चित्र दिसून येते. यात प्रामुख्याने महिला वर्गाची मोठ्या प्रमाणात कुचंबना होत आहे. शासनाच्या हगणदारअी मुक्त या संकल्पनेचा पालिकेच्या उदासीन कारभारामुळे अक्षरश: फज्जा उडाल्याचे चित्र दिसून येते.

वसई तालुक्याची लोकसंख्या वेगाने वाढत चालली आहे. बकाल वस्त्या वाढल्या आहेत. या वस्त्यांतील नागरिक उघड्यावर शौचास जात असल्याने दुर्गंधी वाढली होती. पालिकेने याच धर्तीवर ठिकठिकाणी धवल शौचालये व स्वच्छतागृहे बांधून नागरिकांसाठी व्यवस्था केली. मात्र देखभालीअभावी सध्या ही स्वच्छतागृहेच डबघाईला आल्याने नागरिक पुन्हा उघड्यावर शौचास जात असल्याचे चित्र दिसते. त्यामुळे दुर्गधी व अस्वच्छता वाढीस लागून रोगराई पसरण्याचा धोका वाढला आहे. हगणदारी मुक्त संकल्पनेंतर्गत बांधलेली धवल शौचालये स्वच्छतेअभावी डबघाईला आली आहेत.

प्रामुख्याने यात सर्वाधिक गैरसोय होते ती महिलांची. एखाद्या कामासाठी घराबाहेर पडणाऱ्या महिलांना अस्वच्छ शौचालये व स्वच्छतागृहांमुळे नाक मुरडुन तेथुन जावे लागते. पालिका प्रशासनाचे या स्वच्छतागृहांकडे होत असलेले दुर्लक्ष टिकेचा विषय ठरला आहे. दरम्यान, पालिकेने उभारलेल्या स्वच्छतागृहे व शौचालयांत नागरिकांना पाच ते 10 रूपये मोजावे लागतात. मात्र तेथे असलेल्या कर्मचाऱ्यांकडूनही शौचालयांची स्वच्छता ठेवली जात नसल्याने नागरिक उघड्यावर जाणे पसंत करत आहेत.

# अनंत चतुर्दशीसाठी पालिका, प्रशासन यंत्रणा सज्ज

**वसई -विरारमधील विसर्जन स्थळावर चोख व्यवस्था**

**प्रतिनिधी**
■ **वसई**

शनिवारी (दि.07) वसईत लाडक्या गणरायांचे थाटात आगमन झाले. यात दिड, अडीच, पाच, सहा, सात, आठ, नऊ व दहा दिवसांच्या बाप्पांना भावपूर्ण वातावरणात निरोप दिल्यानंतर आज अनंत चतुर्दशीच्या दिवशी लाडक्या गणरायांना निरोप देण्यात येणार आहे. वसईत एकूण 3 हजार 550 गणरायांचे आज 105 ठिकाणी विसर्जन होणार आहे. यात 350 सार्वजनिक तर 3 हजार 200 खाजगी गणरायांचा समावेश आहे. विसर्जन शांततेत पार पडावे

### 3 हजार 550 गणेशांना निरोप देण्यासाठी जनसागर लोटणार

यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले असून अग्निशमन दल, लाईफ गार्ड्स व एकूणच यंत्रणा सज्ज झाली आहे.

अकरा दिवसांच्या बाप्पांच्या जल्लोषात कोणीही दारू पिऊन धिंगाणा करू नये याची खबरदारी सार्वजनिक मंडळांनी घ्यावी अशा सूचना पोलिसांनी सार्वजनिक मंडळांना केल्या आहे. दरम्यान, यावर्षी तालुक्यात 31 हजार 708 गणरायांचे आगमन झाले होते. त्यापैकी साडेतीन हजार अकरा दिवसीय बाप्पांचे आज विसर्जन होणार आहे. पालिकेने यावर्षी खाजगी छोट्या आकाराच्या मुर्त्यांसाठी खास कृत्रिम तलावांची निर्मिती केली आहे. या तलावांना वसईकरांनी भरभरून प्रतिसाद दिल्याने वसईतील सार्वजनिक तलावांचे सौंदर्य अबाधित ठेवण्यास वसईकरांनी हातभार लावला आहे. तसेच पालिकेने 105 ठिकाणी विसर्जनाची व्यवस्था केली असून तेथे मोठा पोलीस फौजफाटा तैनात असणार आहे.

तलाव, खाडी, समुद्र याठिकाणी मोठ्या मुर्त्यांचे विसर्जन करताना पालिकेने चोख व्यवस्था ठेवली आहे. तसेच लाईफ गार्ड्स व अग्निशमन दलाच्या जवानांचाही विसर्जनस्थळावर राबता असणार आहे. बाप्पांच्या विसर्जन मिरवणुकीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात असणार आहे. एकूणच बाप्पांच्या विसर्जन स्थळावर पोलिसांची करडी नजर असणार आहे.

# जलमार्ग विस्तारतोय !



### वसई-भाईंदरनंतर नारिंगी-सफाळे व पालघर रो-रो सेवा सुरू होणार

**प्रतिनिधी**
■ **वसई**

मेरी टाईम बोर्डाने सुरू केलेल्या वसई-भाईंदर व भाईंदर-वसई या रो-रो सेवेला नागरिकांचा तुफान प्रतिसाद मिळत असतानाच आता मेरी टाईम बोर्ड नारिंगी ते सफाळे व नारिंगी ते पालघर अशा रो-रो फेऱ्या लवकरच सुरू करणार असल्याचे संकेत प्राप्त होत आहेत. रो-रो फेऱ्यांचे कामदेखील पूर्ण झाले असून विधानसभा निवडणुकीच्या आधी त्याचा शुभारंभ होणार असल्याची माहिती मिळत आहे.

मेरी टाईम बोर्डाने वसई-भाईंदर व भाईंदर-वसई या जलमार्गासाठी रो-रो फेऱ्या सुरू केल्यानंतर या जलप्रवासाला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. प्रवाशांचा प्रतिसाद लक्षात घेता मेरी-टाईम बोर्डाने येथील प्रवासासाठी दोन बोटींची सोय केली आहे. मात्र यातील एक बोट नादुरूस्त असून एकाच बोटवर सध्या प्रवाशांचा भार आहे. त्यानंतरही जलमार्गाला प्रवासी वर्ग मोठी पसंती देत असल्याने मेरी टाईम बोर्ड आता नारिंगी ते सफाळे व नारिंगी ते पालघर अशा रो-रो फेऱ्या लवकरच सुरू करणार आहे. या फेऱ्या सुरू झाल्यास वसई व पालघर ही दोन प्रमुख शहरे एकमेकांना जोडली जातील. तसेच या जलमार्गातून दळणवळण वाढून नागरिकीकरणाचा वेग देखील वाढेल, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.

वसईतून पालघर येथे जाण्यास एक ते दीड तास लागतात. मात्र ट्रॅफिक असल्यास पालघर येथे जाण्यासाठी नागरिकांना दोन ते तीन तासांचा कालावधी लागतो. अशा धर्तीवर नारिंगी ते सफाळे व नारिंगी ते पालघर अशा रो-रो फेऱ्या लवकरच सुरू होणार असल्याने वसई ते पालघर असे अंतर जलमार्गाने अगदी हाकेच्या अंतरावर येणार आहे. विधानसभेच्या आधी या रो-रो फेऱ्यांचा शुभारंभ होणार आहे.

### जिजामाता उद्यान बुधवारी खुले, गुरूवारी बंद

**प्रतिनिधी**
**मुंबई**

भायखळा (पूर्व) येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय बुधवार, १८ सप्टेंबर २०२४ रोजी जनतेकरिता खुले राहणार आहे. तर दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवारी १९ सप्टेंबर २०२४ रोजी बंद ठेवण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेचा आधार घेत बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने ईद-ए-मिलाद सणानिमित्त मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन्ही जिल्ह्यात सोमवारी १६ सप्टेंबर २०२४ रोजी पूर्वी घोषित केलेली सार्वजनिक सुटी रद्द करून त्या ऐवजी बुधवारी, १८ सप्टेंबर २०२४ या दिवशी जाहीर केली आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमीत्त रामदास आठवले यांच्या हस्ते डहाणू येथे दिव्यांगजणांना मोफत साहित्य वाटप

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

भारताचे लोकप्रिय आणि यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उद्या दिनांक 17 सप्टेंबर रोजी वाढदिवसानिमीत्त पालघर जिल्हयातील डहाणु येथे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांच्या शुभहस्ते दिव्यांगजणांना मोफत सहायक उपकरण साहित्य वाटप करण्यात येणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस देशभरात साजरा होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमीत्त दिव्यांगजणांना मोफत सहायक उपक्रमाच साहित्य वाटप ना. रामदास आठवले यांच्या हस्ते आज दिनांक मंगळवार 17 सप्टेंबर रोजी सकाळी 11 वाजता आयोजित करण्यात आलेले आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे सन 2014 मध्ये पहिल्यांदा प्रधानमंत्री झाल्यानंतर सर्वप्रथम त्यांनी अपंगांना अपंग न म्हणता दिव्यांगजण ही संज्ञा दिली. दिव्य अंग असणा-या या दिव्यांगजणांचा आपण सन्मान केला पाहिजे असे आवाहन देशाला केले. यानुसार दिव्यांगजणांना नोकरीमध्ये आणि शिक्षणामध्ये आरक्षण वाढविण्यात आले असून त्यानुसार दिव्यांगजणांना नोकरी आणि शिक्षणामध्ये आरक्षण दिले जात आहे.

सामाजिक न्याय मंत्रालयाद्वारे दिव्यांगजण हे विशेष विभाग सुरु करण्यात आला असून सामाजिक न्याय मंत्रालयाच्या अंतर्गत दिव्यांगजणांना विविध वस्तुंचे वाटप करण्यात येत आहे. आज दिनांक 17 सप्टेंबर रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमीत्त डहाणू जिल्हा पालघर येथे केंद्रीय राज्यमंत्री यांच्या शुभहस्ते दिव्यांगजणांना मोफत सहायक उपक्रमाचे वाटप करण्यात येणार आहे.

# खासदार ॲड. चंद्रशेखर आजाद बुधवारी चैत्यभूमीला देणार भेट

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मोहम्मद पैगंबर यांच्या जन्मदिनाच्या पार्श्वभूमीवर बुधवार, 18 सप्टेंबर 2024 रोजी आयोजित ईद-ए-मिलाद कार्यक्रमासाठी भीम आर्मी संस्थापक आणि आजाद समाज पार्टी (कांशीराम ) चे अध्यक्ष खासदार चंद्रशेखर आजाद मुंबई दौऱ्यावर येत आहेत . खासदार झाल्यानंतर आजाद यांचा हा पहिलाच महाराष्ट्र दौरा असून मुंबई विमानतळावरून दुपारी १२ वाजता ते दादर चैत्यभूमी येथे डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केल्यानंतर दुपारी २ वाजता ते कार्यक्रम स्थळी रवाना होणार आहेत .

उत्तर प्रदेशातील नगिना लोकसभा मतदार संघात स्वबळावर सुमारे दीड लाखांच्या फरकाने विजयी झाल्यानंतर ऍड . चंद्रशेखर आजाद यांच्या नावाची देशभरात चर्चा सुरू आहे. देशभरात लोकप्रिय असलेल्या ऍड आजाद यांनी दादर रेल्वे स्थानकाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे, . पोलीस दलाला सुविधा पुरवाव्यात यांसह बहुजन समाजाच्या अनेक विषयांवर लोकसभेत चर्चा उपस्थित केली आहे. लोकसभेत त्यांनी केलेल्या भाषणाचे व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड वायरल झाले आहेत .

स्वातंत्र्यपूर्व काळात अस्तित्वात आलेल्या ऑल इंडिया खिलाफत कमिटीने मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त भायखळा पूर्व लव्ह लेन,येथील खिलाफत हाऊस येथे दुपारी २ वाजता सीरत-उन-नबी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले आहे .अखिल भारतीय खिलाफत समितीचे अध्यक्ष सरफराज आरजू यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या कार्यक्रमासाठी ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत . त्यांच्यासह हजरत अल्लामा मौलाना सईद वली अश्रफ अशरफी अल जिलानी, सज्जादा नशीन आस्ताने आलिया हुजूर अशरफुल औलिया, पुरे कामगार शरीफ, फैजाबाद हे मान्यवर देखील यावेळी पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत . त्या नंतर ते दुपारी ३ वाजता ईद-ए-मिलाद मिरवणुकीत ही सहभागी होणार आहेत.

# पालिका राबवणार परिमंडळनिहाय सर्वोत्तम नैसर्गिक गणेश विसर्जन स्थळ व कृत्रिम गणेश विसर्जन स्थळ स्पर्धा

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

श्री गणेश मूर्ती विसर्जन प्रक्रिया अधिक पर्यावरणपूरक, सुयोग्य, आणि सुरक्षित होण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने अभिनव उपक्रम आयोजित केला आहे. मुंबईतील श्री गणेश मूर्ती विसर्जन स्थळांवरील सेवा-सुविधांमध्ये वाढ व्हावी, विसर्जनाचा सोहळा पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हावा, विसर्जन स्थळांवरील व्यवस्थापन निटनेटक्या पद्धतीने व्हावे, या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी परिमंडळनिहाय सर्वोत्तम नैसर्गिक विसर्जन स्थळ व कृत्रिम विसर्जन स्थळ स्पर्धा २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे.

महानगरातील श्री गणेश मूर्ती विसर्जन प्रक्रिया अधिक शिस्तबद्ध, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक होईल आणि परिमंडळनिहाय स्पर्धात्मक वातावरण व्हावे, हा स्पर्धेमागचा हेतू असल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे.

यंदाचा श्री गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी गत सहा महिन्यांपासून बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन कार्यरत आहे. प्रशासनाने मुंबईकरांना श्री गणेश मूर्ती विसर्जनासाठी २०४ कृत्रिम तलाव उपलब्ध करून दिले आहेत तसेच नैसर्गिक विसर्जन ठिकाणी देखील विविध उपाययोजना केल्या आहेत.

उत्तम व्यवस्थापन, गर्दीचे नियोजन, निर्माल्याचे नियोजन, परिसर स्वच्छता, सुशोभिकरण व विद्युत रोशणाई, सीसीटीव्हीचे नियोजन, आरोग्यविषयक सुविधा, दिशादर्शक फलकांची उपलब्धता, स्वच्छतागृहांची उपलब्धतता आदी निषकांचा या स्पर्धेत विचार करण्यात येणार आहे.

विसर्जनस्थळी विविध उपाययोजना करण्यासाठी अर्थातच बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी कर्मचारी आणि कामगार यांची मोलाची भूमिका आहे. ही स्पर्धा आयोजित केल्यामुळे अधिकारी - कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक आणि निकोप स्पर्धा निर्माण होणार आहे. तसेय यशस्वी कर्मचाऱ्यांचा सन्मानही केला जाणार आहे. यातून पुढील कामासाठी त्यांना प्रेरणा मिळणार आहे.

परिमंडळनिहाय सह आयुक्त, उप आयुक्त हे संबंधित परिमंडळातील नैसर्गिक विसर्जन स्थळे व कृत्रिम विजर्सन स्थळे यांची तपासणी करणार आहेत. उत्कृष्ट व्यवस्थापन केलेल्या एका नैसर्गिक विसर्जन स्थळाची व एका कृत्रिम विसर्जन स्थळाची निवड करण्यात येणार आहे. तसेच या स्पर्धेत प्रत्येक परिमंडळातील एक उत्तम नैसर्गिक विसर्जन स्थळ आणि एक उत्तम कृत्रिम विसर्जन स्थळ निवड करण्यात येणार आहे.



**मुंबई ।** माहीम येथील जरीवाला मित्र सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यंदा अमृत महोत्सवी वर्ष साजरा करत आहे. मंडळाने अमृत महोत्सवी वर्षा निमित्त जयपूर येथील पॅलेसचा देखावा उभारला आहे. या श्री गणरायाचे दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्राचे लॉटरी विक्रेत्यांचे तडफदार नेते विलास सातार्डेकर यांनी भेट देऊन पदाधिकाऱ्यांसह श्री गणेशाचे दर्शन घेतले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी सरचिटणीस राजेश बोरकर, उपाध्यक्ष कमलेश विश्वकर्मा, पत्रकार संजय डहाळे आदिसह मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते..

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

(Annexure-1)
**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public at large that my client Mr. Nitish Suresh Savant having its residential address at 802, Maruti Towers, Plot No. 35, Sector No. 11, C.B.D Belapur, Navi Mumbai, 400 614 is the Owner of the property bearing Flat No. 10, First Floor in Pushpagandha Co-operative Housing Society Ltd. having address at Final Plot No. 923, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai 400 025 ("said Property"). My client has informed that he has lost/misplaced the original share certificate No. 21 for shares bearing No. 66 to 70 of Rs.50 each standing in name of Late Mr. Suresh Anant Savant allotted by Pushpagandha Co-operative Housing Society Ltd. in respect of the Said Property and the same is not traceable inspite of diligent search of the same. My client have filed missing report No. 40750/2024 Dated 22.05.2024 in Dadar Police Station for the loss of the said Original Share Certificate. My client have applied for issuance of a duplicate share certificate with the Society. Any person having any claim against, in to or upon the said Property relating thereto or any part thereof by way of sake exchange, lease, license, trust, lien, inheritance, attachment, lis pendens, mortgage, charge, gift, possession, security on the basis of the said lost/misplaced share certificate or otherwise howsoever are hereby required to notify the same in writing alongwith supporting documentary evidence to the undersigned at office address 317A, New Bake House, Bake House Lane, Kala Ghoda, Fort, Mumbai 400 001 within 14 days from the date hereof failing which my client shall take requisite steps to deal with the said property without reference to the claim and/or objection, if any shall be considered as waived and/or abandoned.

Dated this 20th Day of August, 2024

**Adv. Nikhil Vijay Adkine**
317A, New Bake House,
Bake House Lane,
Kala Ghoda, Fort,
Mumbai
400 001.
Mob. No. 7588677720
EmailID-office.adkine@gmail.com

# वर्षावरील गणपतीची आरती केली, मुंबईतील घरकाम करणाऱ्या महिलांनी

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील घरकाम करणाऱ्या लाभार्थी महिलांनी काल मुख्यमंत्र्यांचे शासकिय निवासस्थान असलेल्या वर्षावरील श्री गणेशाचे दर्शन घेतले व आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित महिलांसोबत आरती केली. त्यांचे मुख्यमंत्र्यांनी आदरातिथ्य केले.



हे सरकार कष्टकऱ्यांचे, वारकऱ्यांचे, महिलांचे सरकार आहे. महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतून रक्षाबंधनाच्या दिवशी लाभ मिळाला. दिवाळीतही भाऊबिजेला महिलांना लाभ मिळेल, असे सांगून शिवसेनेच्या प्रवक्त्या शीतल म्हात्रे यांनी महिलांना सक्षम करणे आणि त्यांची सुरक्षितता करणे सरकारचे प्राधान्य आहे. असे सांगितले.

उबाठाची अवस्था ढवळ्या शेजारी पोवळ्या बांधला वाण नाही पण गुण लागला अशी झाली आहे. मुख्यमंत्री होण्याचा मोह नाही म्हणता मग भाजपसोबत युती का तोडली आणि नंतर स्वत:ला मुख्यमंत्री कसे जाहीर केले, असा सवाल शीतल म्हात्रे यांनी केला. उबाठाला मुख्यमंत्री व्हायचे आहे पण काँग्रेस आणि राष्ट्रवादीला मान्य नाही. त्यामुळे सकाळच्या भोंग्याकडे लक्ष देऊन वाटेल ते बरळू नका, असा टोला शीतल म्हात्रे यांनी लगावला.

**संजय राऊत यांच्यावर टीका**

*ज्यांनी कोरोनामध्ये कोट्यवधींचा घोटाळा केला. पत्राचाळीचा घोटाळा केला त्यांना १५०० रुपयांचे मोल नाही कळणार, अशी टीका त्यांनी उबाठा चे नेते संजय राऊत यांच्यावर केली. स्वत: खासदार म्हणून काही दिले नाही. महिलांना सरकार काही देत आहे तर राऊत यांच्या पोटात दुखत आहे, असेही शीतल म्हात्रे म्हणाल्या.*

**जाहिर नोटीस**

माझे अशिल शफिक अहमद मोहम्मद असगर अन्सारी यांनी दिलेल्या माहितीवरुन ही जाहीर नोटीस देत आहे. माझे अशिल खालील नमुद रूम मुळ मालक रमझान अली जाफर हुसैन यांच्या नावावरुन स्वत:च्या नावे हस्तांतर करीत आहेत. तरी सदर मिळकतीबाबत जर कोणा व्यक्तीचा, संस्थेचा, बँकेचा किंवा अन्य कोणत्याही कंपनीचा दावा, बोजा, हक्क अधिकार किंवा हरकत असल्यास माझ्या खालील पत्त्यावर व मालमत्ता अधिकारी, पहिला मजला, ई विभाग यांचे कार्यालय, १० शेख हाफिझुद्दीन मार्ग, भायखळा (पश्चिम), मुंबई ४००००८ या पत्त्यावर आपली हरकत १४ दिवसांच्या आत पुराव्यानिशी सादर करावी, अन्यथा सदरहु दावे माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत.

**मिळकतीचा तपशील :-**
रूम नं. १२५, २ रा मजला, लंबी सिमेंट चाळ, 'बी' भायखळा स्टेशन रोड, गणेश हरी पांरुदेकर मार्ग, मोमीनपुरा, भायखळा (पश्चिम), मुंबई ४०००११

**सही /-**
**ॲड. एस. बी. शिंदे**
**२/१९, म्युनिसिपल चाळ,**
**परेल, भोईवाडा,**
**मुंबई - ४०००१२**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 88**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ८८**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## सुट्टीचा दिवस अचानक बंदलल्याने पालिका कर्मचारी अधिकाऱ्यांचे आर्थिक नुकसान नको - बाबा कदम

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाने दरवर्षीप्रमाणे १६ सप्टेंबर २०२४ रोजी "ईद-ए-मिलाद" या सणाची सार्वजनिक सुट्टी जाहिर केली होती. त्या अनुषगांने पालिकेतील अनेक कामगार, कर्मचारी, अधिकारी यांनी सलग सुट्टीच्या दृष्टीकोनातून १६ सप्टेंबर रोजी सुट्टीला अनुसरुन प्रवास सहाय्य भत्ता व नियमित स्वरुपात पूर्व मंजुरीने सुट्टी घेऊन ती उपभोगण्यासाठी आपल्या गावी तसेच बाहेर गावी गेले आहेत. महाराष्ट्र शासनाने अधिसूचना काढल्याने पालिकेने एक परिपत्रक काढून आकस्मितपणे पुर्वी जाहिर केलेली १६ सप्टेंबर २०२४ ची सुट्टी रद्द करुन ती १८ सप्टेंबर रोजी जाहिर केली आहे. मात्र कामगार, कर्मचारी, अधिकारी यांनी घेतलेली सुट्टी रद्द करुन (गावावरुन येणे/त्यांच्या कुटुंबियांसह केलेला प्रवास अचानक रद्द करून) १६ सप्टेंबर रोजी त्यांना कर्तव्यावर हजर होणे शक्य झालेले नाही. अश्या कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या सलग सुट्ट्यांचा लाभ त्यांना देण्यात यावा तसेच त्यांचे कोणत्याही प्रकारे आर्थिक नुकसान करण्यात येऊ नये अशी विनंती म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे अध्यक्ष बाबा कदम यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पत्राद्वारे केली आहे.



# तलावात 99 टक्के पाणी साठा जमा : मुंबईकरांची पाण्याची चिंता मिटली

प्रतिनिधी
■ मुंबई

गणेशोत्सवात मोठा पाऊस पडून सर्व तलाव भरून वाहू लागतील असा अंदाज होता.पण तसे घडले नाही. पण तलाव क्षेत्रात थोडाफार पाऊस होत असल्याने काल सकाळी ६ वाजेपर्यंत मुंबई ला पाणी पुरवठा करणाऱ्या तलावांमध्ये ९८.७१ टक्के पाणी साठा जमा झाला आहे. हा पाणीसाठा गेल्यावर्षी पेक्षा वाढला आहे. गेल्यावर्षी याच दिवशी ९६.९८ टक्के पाणी साठा जमा झाला होता.



एकूण सात तलावांपैकी ४ तलाव जुलै महिन्यात भरले आहेत. उर्वरित अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा आणि भातसा हे तीन तलाव भरायचे बाकी होते तेही आता भरायच्या मार्गावर आहे. ते १ मीटर पेक्षा खूप कमी भरायचे शिल्लक आहेत. मुंबईला वर्षभर पाणीसाठा वापरण्यासाठी १ ऑक्टोंबर रोजी सात ही तलावांमध्ये १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर पाण्याची गरज असते. कालपर्यंत तो १४ लाख ३८ हजार ६९७ दशलक्ष लिटर इतका पाणीसाठा जमा झाला आहे.

***सातही तलावात सर्वाधिक पाणीसाठा***

*मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही तलावांमध्ये मागच्या दोन वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक पाणीसाठा जमा झाला आहे. त्यामुळे पुढील पावसाळ्यापर्यंत मुंबईकरांची पाण्याची चिंता मिटली असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. पाणीपुरवठा करणाऱ्या सात तलावांत मागील दोन वर्षांच्या तुलनेत अधिक पाणीसाठा उपलब्ध करून देत मुंबईकरांवर ओढवणारे पाणी टंचाईचे संकट दूर झाले आहे. अद्यापही पावसाचा अर्धा महिना बाकी आहे. त्यामुळे आता मुंबईकरांना पुढील वर्षभरात पाणीटंचाईचे अजिबात चिंता करण्याची गरज भासणार नाही.*

## 'फेक न्यूज'ने धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गुन्हे दाखल करा!

### काँग्रेसची कुलाबा पोलीस स्थानकात तक्रार

प्रतिनिधी
■ मुंबई

कर्नाटकातील गणपती विसर्जनाबाबत 'फेक न्यूज' पसरवून राज्यात धार्मिक तेढ निर्माण केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करावी अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने केली आहे. यासंदर्भात कुलाबा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

१३ सप्टेंबर रोजी बंगुळुरुच्या टाऊन हॉल परिसरात कोणतीही परवानगी न घेता विश्व हिंदू परिषदेने आंदोलन आयोजित केले होते. यावेळी आंदोलक गणपतीची मूर्ती घेऊन आंदोलन करत होते. आंदोलकांना ताब्यात घेताना मूर्तीला इजा होऊ नये म्हणून पोलिसांनी मूर्ती सुरक्षित ठेवली व आंदोलकांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी विधिवत पूजा अर्चना करून गणपतीबाप्पाचे विसर्जन केले. ही माहिती अनेक फॅक्ट चेक करणा-या वेबसाईट्स व राष्ट्रीय वृत्तवाहिन्यांनी फॅक्ट चेकच्या माध्यमातून सार्वजनिक केली आहे.

राजकीय फायद्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या संदर्भात माध्यमांना प्रतिक्रिया देताना कर्नाटक सरकारने व पोलिसांनी गणपती उत्सव थांबवून गणपतीची मूर्ती जप्त केली असे धडधडीत असत्य विधान करून सणासुदीच्या काळात राज्यात धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यासोबतच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आपल्या एक्स (ट्वीटर) हँडलवरून या संदर्भात चुकीची माहिती प्रसारित करून कर्नाटकच्या काँग्रेसला जबाबदार धरले. तर भाजपचे आमदार नितेश राणे यांनी या संदर्भात खोटी माहिती प्रसारित करून समाजात तेढ आणि धार्मिक तणाव निर्माण करण्याचा व सामाजिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई अशी मागणी करणारी लेखी तक्रार प्रदेश काँग्रेसच्या विधि विभागाचे अध्यक्ष ॲड. रविप्रकाश जाधव यांनी कुलाबा पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरिक्षकाकडे केली आहे. निवडणुकीच्या तोंडावर राजकीय फायद्यासाठी सत्ताधारी पक्षाचे नेत्यांकडून सातत्याने फेक न्यूज आणि अफवा पसरवून राज्यात धार्मिक आणि जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यांचे हे कृत्य सामाजिक शांतता भंग करणारे आहे. पोलिसांनी यांची गंभीर दखल घेऊन कारवाई करावी अशी मागणी काँग्रेस पक्षाने

# अंधेरी पूर्व व पश्चिम मधील काही भागात गुरुवारी व शुक्रवारी पाणी पुरवठा बंद

प्रतिनिधी
■ मुंबई

के पूर्व आणि के पश्चिम विभागात निगमवाहिनीवरील (आऊटलेट) झडपा (वॉल्व्ह) बदलण्याच्या कामामुळे गुरुवार, १९ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री ८ वाजेपासून शुक्रवार, २० सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत काही भागांचा पाणीपुरवठा राहणार बंद राहणार आहेत. पाणीपुरवठा पूर्ववत झाल्यानंतर पाणी गाळून आणि उकळून पिण्याचे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले.

या विभागात होणार परिणाम

के पूर्व विभागातील - महाकाली मार्ग, पूनम नगर, गोनी नगर, तक्षशिला मार्ग, एमएमआरडीए वसाहत, दुर्गा नगर, पेपर बॉक्स, मालपा डोंगरी क्रमांक ३, शेर ए पंजाब, बिंद्रा संकूल, हंजर नगर, गणेश नगर, शोभना परिसर (दैनंदिन पाणीपुरवठ्याची वेळ – पहाटे ४.३० ते सकाळी ७.५० वा.) पाणीपुरवठा बंद राहील. तसेच सुंदर नगर, गौतम नगर, मॉडर्न बेकरी, प्रजापूरपाडा (दैनंदिन पाणीपुरवठ्याची वेळ - पहाटे ५.०० ते सकाळी ८.०० वा.) पाणीपुरवठा बंद राहील. तर त्रिपाठी नगर, मुन्शी कॉलनी, बस्तीवाला कंपाऊंड, अचानक कॉलनी, कलेक्टर कंपाऊंड, सारीपूत नगर (दैनंदिन पाणीपुरवठ्याची वेळ - सकाळी ८.०० ते सकाळी १०.०० वा.) पाणीपुरवठा बंद राहील. व दुर्गानगर, मातोश्री क्लब (दैनंदिन पाणीपुरवठ्याची वेळ - सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वा.) पाणीपुरवठा बंद राहील.

के पश्चिम विभागातील सी.डी. बर्फीवाला मार्ग, उपाश्रय गल्ली, स्वामी विवेकानंद मार्ग अंधेरी, दाऊद बाग, केव्हणी पाडा, धाकुशेठ पाडा, मालकम बाग, अंधेरी मार्केट, भर्डावाडी, नवरंग सिनेमाच्या मागे, अंधेरी गावठाण, आंब्रे गार्डन पंप व गझदर पंप, गिल्बर्ट हिलचा काही भाग, तीन नळ, गावदेवी डोंगरी मार्ग, उस्मानिया डेअरीचा काही भाग (दैनंदिन पाणीपुरवठ्याची वेळ - सकाळी ७.३० ते दुपारी १२.०० वा.) पाणीपुरवठा बंद राहील.

संबंधित परिसरातील नागरिकांनी पाण्याचा पुरेसा साठा करावा. पाणी जपून आणि काटकसरीने वापरावे. आऊटलेट दुरुस्ती कामानंतर नियमित वेळेनुसार पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येईल. तसेच, पाणीपुरवठा सुरळीत झाल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून ४ ते ५ दिवस पाणी गाळून आणि उकळून वापरावे, असे महानगरपालिका प्रशासनातर्फे आवाहन करण्यात आले आहे.

# मुंबई पोलिसांची बदलापूरात कारवाई, एमडी बनविणारा कारखाना उध्वस्त

**मुंबई:** मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी कक्षाने (एएनसी) बदलापूर-कर्जर मार्गावरील येथे कारवाई करून मेफेड्रॉनचा (एमडी) कारखान उध्वस्त केला. वांगणी येथे हा कारखाना सुरू होता. या कारवाईत चौघांना अटक करण्यात आली आहे. आरोपींपैकी एकाने रसायनशास्त्राचे शिक्षण घेतले असून तो एका कंपनीत निर्मिती व्यवस्थापक म्हणून काम करत होता.

एएनसीच्या घाटकोपर युनीटने गस्तीवेळी ११ तारखेला मानखुर्द परिसरात एमडी विकणाऱ्या दोघा तस्करांना पकडले होते. त्यांच्या ताब्यात १०६ ग्रॅम एमडी सापडले होते. दोघांच्या चौकशीत तिसऱ्या आरोपीचे नाव उघड झाले. त्यालाही शोधून पकडण्यात आले.

# मुंबईचे शिक्षणाधिकारी राजेश कांकाळ यांचे महिनाभराच्या आतच निलंबन मागे

प्रतिनिधी
■ मुंबई

बदलापूर येथील नावाजलेल्या आदर्श विद्यालयात १३ ऑगस्ट २०२४ रोजी दोन लहान मुलींवर झालेल्या अत्याचाराचे प्रकरण माहित असताना त्यांनी ते शिक्षक संचालकांना कळविले नाही म्हणून ठाण्याचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांचे निलंबन राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी केले होते.तर त्याच वेळी मुंबई महानगरपालिका शाळांमधे सी सी टिव्ही कॅमेरे लावण्यासंबधीचे आदेश देण्यात आले असताना ते लावले नसल्याने मंत्री केसरकर यांनी मुंबई महापालिका शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ यांचेही निलंबन करण्याची शिफारस पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे केली होती.

आता मात्र कंकाळ यांचे निलंबन मागे घेण्यात आले आहे. काल त्यांनी शिक्षण विभागाच्या वतीने सोमवार, १६ सप्टेंबर, २०२४ रोजी घोषित केलेली ईद-ए-मिलाद ची सार्वजनिक सुट्टी रद्द करून ती आता बुधवार, १८ सप्टेंबर, २०२४ या दिवशी जाहीर करण्यात आल्याच्या परिपत्रकावर राजेश कंकाळ यांची शिक्षणाधिकारी (माध्यमिक) म्हणून स्वाक्षरी आहे.निलंबन मागे घेतल्यानंतरचे त्यांचे हे पहिलेच परिपत्रक आहे.

शिक्षणाधिकारी यांच्या निलंबनाची घोषणा मंत्री दीपक केसरकर यांनी पालिका मुख्यालयातील वार्ताहर कक्षात २३ ऑगस्ट २०२४ रोजी केली होती त्यावेळी अतिरिक्त आयुक्त सुमित सैनी पत्रकार परिषदेच्या ठिकाणी आले होते.व कंकाळ यांचे निलंबन मागे घेण्याबाबत मंत्री केसरकर यांना सांगत होते.पण मंत्री केसरकर हे तत्काळ निलंबन मागे घेण्याबाबत तयार झाले नव्हते.अशी माहिती मिळते. पण १३ सप्टेंबर २०२४ रोजी कंकाळ यांच्या स्वाक्षरीने परिपत्रक निघाल्याने त्यांचे निलंबन मागे घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

# मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांना 20 टक्के सानुग्रह अनुदान देण्याची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कायम कामगार, कर्मचारी, अधिकारी, निरिक्षकीय कर्मचारी, सुरक्षा दल कर्मचारी, आरोग्य खात्यातील आरोग्य सेविका, सर्व कंत्राटी कामगार, बहुउद्देशीय कामगार, आरसीएच २ मधील कर्मचारी, मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्थेतील कर्मचारी, एनयुएचएम / डी.एस. ऐंटरप्रायझेस मार्फत कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभागात कार्यरत असणारे कर्मचारी तसेच बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांना प्रतिवर्षाप्रमाणे सन २०२३ २४ या आर्थिक वर्षाचे बोनस / सानुग्रह अनुदान दिवाळीपूर्वी २० टक्के देण्याची मागणी दी म्युनिसिपल युनियनने पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे केली आहे.

मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या कामगार, कर्मचारी, अधिका-यांना वर्षानुवर्षे सातत्याने विनाखंड सानुग्रह अनुदानाचे प्रदान केले आहे, या पार्श्वभूमीवर ही मागणी मंजूर करणे आवश्यक आहे. नियोजित विधानसभेच्या निवडणूकीची आचार संहिता सुरु होण्यापूर्वी विषयांकित मागणीवर चर्चा करून निर्णय घेण्याच्या अनुषंगाने कृपया त्वरित बैठकीचे आयोजन करावे व त्याप्रमाणे आम्हांला अवगत करावे, अशी विनंतीही युनियनचे सरचिटणीस रमाकांत बने यांनी आयुक्तांना केली आहे.

# नायर रुग्णालयातील वैद्यकीय विद्यार्थिनीच्या लैंगिक छळाचा आरोप असलेल्या सहयोगी प्राध्यापकाचे निलंबन

### महानगरपालिका मुख्यालय स्तरावरील समिती करणार चौकशी

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई सेंट्रल स्थित मुंबई महानगरपालिकेच्या बाई य. ल. नायर रुग्णालयात वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या एका विद्यार्थिनींचा लैंगिक छळ केल्याचा आरोप असलेल्या सहयोगी प्राध्यापकाला पालिका प्रशासनाने निलंबित केले आहे. तसेच, या प्रकरणाची चौकशी महानगरपालिका मुख्यालय स्तरावरील सावित्रीबाई फुले स्त्री संसाधन केंद्र प्रमुख अंतर्गत तक्रार समितीकडे सोपवण्यात आली आहे. या समितीकडून चौकशीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर प्राप्त होणाऱ्या निष्कर्षानुसार पुढील कारवाई केली जाईल, असे महानगरपालिका प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.




नायर रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या एका विद्यार्थिनीने, रुग्णालयात कार्यरत सहयोगी प्राध्यापकाने लैंगिक छळ केल्याचा आरोप करून त्याबाबत तक्रार केली होती. रुग्णालय स्तरावरील लैंगिक छळ प्रतिबंधक समितीने या प्रकरणी चौकशी केली. तसेच, 'कार्यस्थळी महिलांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंध प्रमुख अंतर्गत तक्रार समिती व सावित्रीबाई फुले स्त्री संसाधन केंद्र समिती' यांनी देखील या प्रकरणामध्ये गंभीर दखल घेतली.

या लैंगिक छळ तक्रार प्रकरणात अतिरिक्त तक्रारी प्राप्त झाल्या असल्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी ही महानगरपालिका मुख्यालय स्तरावरील 'कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक समिती' यांचेकडे हस्तांतरित करण्यात आली आहे, जेणेकरून या घटनेची आणि तक्रारीची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करता येईल.चौकशीमध्ये आढळलेले प्राथमिक तथ्य आणि घडल्या प्रकाराचे गांभीर्य लक्षात घेता, या तक्रारीनुसार आरोपी असलेल्या सहयोगी प्राध्यापकाचे प्रशासनाने निलंबन केले आहे.

मुख्यालय स्तरावरील चौकशी समितीच्या निष्कर्षानुसार पुढील कारवाईचा निर्णय घेतला जाईल, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात करण्यात आले आहे.

# गोरेगावमधील एमएमआरडीए भ्रष्ट अधिकारी व दलालांच्या संगनमताने करोडोंचा भ्रष्टाचार ?

### प्रकल्पबाधित लाभार्थ्यांना काँग्रेस घरे मिळवून देणार

दत्तात्रय जाधव
■ मुंबई

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए)तर्फे प्रकल्पबाधित लोकांसाठी राम मंदिर गोरेगाव (पश्चिम) येथे सदनिका (घरे) बांधल्या आहेत. परंतु सदनिका वाटप करताना खऱ्या लाभार्थ्यांना न देता बोगस जणांना देण्यात आल्या आहेत. संबंधित अधिकारी व दलाल (मध्यस्थी) यांच्या संगनमताने 100 ते 150 कोटींचा भ्रष्टाचार केला आहे. 4 ते 5 दलाल अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने खऱ्या लाभार्थ्यांची घरे लाटली असून दलाल करोडपती झाले आहेत. दलालांना मदत करणारे या अधिकाऱ्यांचीही उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, प्रकल्पबाधित लाभार्थ्यांचे घरे हडप करणाऱ्या अधिकारी व दलालांचा पर्दाफाश काँग्रेस करणार आहे. दरम्यान, प्रकल्पबाधित खऱ्या लाभार्थ्यांना घरे मिळवून देण्याचा निर्धार मुंबई महिला उपाध्यक्षा माधवी राणे व गौरव राणे यांनी केला आहे.

एमएमआरडीएचे उपआयुक्त राधा विनोद शर्मा यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गोरेगाव पश्चिम येथील राम मंदिरच्या ओशिवरा जिल्हा केंद्र (ओडीसी) येथे एमएमआरडीएतर्फे काही वर्षापूर्वी प्रकल्पबाधितांसाठी पी-५, पी-९, पी-१० अशा १० इमारती बांधण्यात आल्या. पी-५ ही इमारत धोकादायक झाल्यामुळे तत्कालीन महानगर आयुक्त सुदर्शन व उपआयुक्त गोविंद राज यांनी या रहिवाशांसाठी जवळच नव्याने बांधण्यात आलेल्या सिग्मा 1 व आर १६ या इमारतीतील घरे वितरण करण्याचे निणर्य घेतले होते. परंतु या इमारतीमध्ये संबंधित अधिकारी व दलाल (मध्यस्थी) यांच्या संगनमताने बोगस लोकांना घरे देण्यात आली. यामध्ये बोगस वोटींग आय डी, आधार कार्ड, सर्वेक्षण पावती, लाईट बिल, इत्यादीच्या नावाने बोगस लोकांचे नावे पात्र करून घरे लाटण्याचे काम करण्यात येत आहे. बोगस कागदपत्राद्वारे बोगस व्यक्तींना घरे देण्याचे काम सिग्मा 1 इमारतीत चालू आहे. तसेच ठाणे कल्याण व इतर लांबच्या पालिका क्षेत्रातील नागरिकांनाही येथे सदनिका दिल्या जात आहेत. या सर्व बाबींची सखोल चौकशी व्हावी तोपर्यंत सिग्मामधील सर्व अलॉटमेंट स्थगित करून रहिवाशांना हक्काची घरे मिळवून द्यावी, अशी मागणी काँग्रेसच्या मुंबई महिला उपाध्यक्षा माधवी राणे व गौरव राणे यांनी केली आहे.

**गोरेगाव पश्चिम येथील राम मंदिरच्या सिग्मा 1 इमारतीमधील प्रकल्पबाधितांसाठी असलेली घरे अधिकारी व 4-5 दलालांनी कश्या पद्धतीने लाटली. याबाबतची माहिती पुढील अंकात वाचा.**

**PUBLIC NOTICE**

**TATA STEEL LIMITED**
**Bombay House, 24, Homi Mody Street, Mumbai, Maharashtra 400001.**

**Notice** is hereby given that the certificates for the undermentioned securities of the Company has been lost and the holders of the said securities / applicant has applied to the Company to release the new certificate. The Company has informed the holders that the said shares have been transferred to **IEPF** as per **IEPF** Rules.
Any person who has a claim in respect of the said securities should lodge such claim with the Company at its Registered Office within **15 days** from this date, else the Company will proceed to release the new certificate to the holders without further intimation.

| Name Of Holders and jt. Holders | Kind and Face Value of Securities | No. Of Securities | Folio No. | Distinctive Numbers |
|---|---|---|---|---|
| 1. Pandarinath Chintaman Bendre (Shareholder) Dilip Pandharinath Bendre (Claimant) | Equity & FV Rs.10 | 440 | S1P0006588 | 85436831 to 85437270 |

**पश्चिम रेल्वे**

**पिण्यायोग्य पेय जलाचा पुरवठा**

विभागिय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, अभि. विभाग, मुंबई सेन्ट्रल, मुंबई ४०० ००८ खाली देण्यात आलेल्या तपशिलानुसार ई-निविदा मागवित आहेत:

| अनु. क्र. | निविदा सूचना क्र. आणि दिनांक | काम आणि ठिकाण | कामाचे अंदाजे मूल्य रु. मध्ये | इरठे रु. मध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | बीसीटी/२४-२५/१६४ दि. १२.०९.२०२४ | खार ते जोगेश्वरी अनुभाग: एसएसई (प) सांताक्रूझ अनुभागामध्ये ७३० दिवसांसाठी टँकर्सद्वारे पिण्यायोग्य पेय जलाचा पुरवठा. | १९,९८,१५८.५२ | ४०,०००.०० |
| २ | बीसीटी/२४-२५/१६५ दि. १२.०९.२०२४ | वसई रोड, नायगाव आणि भाईंदर: ७३० दिवसांसाठी रेल्वे वसई रोड कॉलनी, स्टेशन, सर्व्हिस बिल्डींग आणि भाईंदर येथील आरपीएफ बराकींसह नायगाव कॉलनी आणि भाईंदर विश्रांती गृहाला टँकर्सद्वारे पिण्यायोग्य पेय जलाचा पुरवठा | १,७२,९४,७९५.०० | २,३६,५००.०० |
| ३ | बीसीटी/२४-२५/१६६ दि. १२.०९.२०२४ | बोरीवली – विरार अनुभाग: ७३० दिवसांसाठी रेल्वे स्थानकांवर टँकर्सद्वारे पिण्यायोग्य पेय जलाचा पुरवठा. | ९८,७८,४००.०० | १,९७,६००.०० |

सर्व वरील निविदांसाठी सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: ०८.१०.२०२४ रोजी १५:०० वा. वरील सर्व निविदांसाठी उघडण्याचा दिनांक आणि वेळ: ०८.१०.२०२४ रोजी १५:३० वा. अधिक माहितीसाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. प्रत्यक्ष आलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. ५४०

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly • आम्हाला फॉलो करा : X.com/WesternRly

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**
**(म्हाडा घटक)**
म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना**

Main Portal: https://mahatenders.gov.in MHADA Portal : https://mhada.maharashtra.gov.in

कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई ईमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभगीय घटक, बी. एम.सी.फ- दक्षिण, कार्यालय अनेक्स इमारत, ३रा मजला, परेल, मुंबई - ४०००१२. यांचेकडे मुंबई शहर जिल्हा अंतर्गत Deputy District Registerar यांचेकडे उचित वर्गात नोंदणीकृत असलेल्या पात्र मजूर सहकारी संस्थाकडून एकूण ०३ कामाकरीता बी - १ (Percentage Rate) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे [ऑनलाईन ] निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरु | २०/०९/२०२४ सकाळी १०.१० | २ | निविदा विक्री बंद | २७/०९/२०२४ दुपारी ५ |
| ३ | तांत्रिक बोली उघडणे | ३०/०९/२०२४ सकाळी ११.०० | ४ | आर्थिक बोली उघडणे | ०१/१०/२०२४ सकाळी ११.०० |

कोणतेही कारण न बेला कोणतीही किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. सशर्त ऑफर्स स्विकारल्या जाणार नाहीत.
टिप - १. कृपया वेबसाईटवर निविदा सूचना पहा.
२. शुध्दीपत्रक / दुरुस्ती जर काही असेल तर ती फक्त वेबसाईटवर प्रकाशित करता येतील.

CPRO/A/703

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us:@mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता /फ [दक्षिण] विभाग,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**
म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता [पश्चिम) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ ( दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४३२) हे जिल्हा उप निबंधक - ३ ( पश्चिम उपनगरे) यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकुण ५० कामाकरीता बी- १ (Percentage Rate) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | १९/०९/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | २६/०९/२०२४ दुपारी ६:१५ वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | ३०/०९/२०२४ सकाळी १०:३० नंतर | ४ | आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | ०३/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

CPRO/A/699

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us:@mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता (प).
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

माझे ध्येय इतर कोणापेक्षाही सरस किंवा अधिक चांगले होण्याचे नाही तर मी स्वत: जसा आहे त्यापेक्षा आणखी कुशल आणि सर्वोत्तम होण्याचा प्रयत्न करत असतो .




- महेंद्रसिंग धोनी
माजी कर्णधार

वृत्तमानस
मुंबई, मंगळवार, १७ सप्टेंबर २०२४

# या क्रांतीला अडवा...

अन्न, वस्त्र आणि निवारा याबरोबरच सध्या मोबाइल हासुद्धा अत्यावश्यक गरजेचा भाग बनलेला आहे. या छोट्या मोबाइलने जगात मोठी क्रांती घडवून आणली आहे. सुख सोयींच्या वस्तूंपैकी समi जाणारी ही वस्तू लोकांच्या घरात सहजपणे शिरली आहे. गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सगळ्यांनाच या वास्तूचा मोह आवरेनासा झाला आहे. जंगल वनात राहणाऱ्या दुर्लक्षित समुदायापर्यंत शासनाच्या मूलभूत गरजा अथवा इतर योजना पोहोचल्या नसतील तिथे ही सेवा पोहोचली आहे. अल्पावधीतच या मोबाईल संस्कृतीने भारतासारख्या गरिबीत मोडणाऱ्या देशालाही विळख्यात घेतले आहे. घरातील प्रत्येक कुटुंबाच्या हातात मोबाईल दिसू लागला आहे. गेल्या काही वर्षांपूर्वी अगदी एका गावात एखाद्या सधन व्यक्तीकडे महानगर टेलिफोन निगमचा फोन असायचा. या फोनवर संपूर्ण गावातील लोकांना संदेश यायचा. पण आता असा संदेश येण्याची मजाही राहिली नाही. अल्पावधीतच ही मोबाईल सेवा लोकांच्या हातात पोहोचल्याने ही एक क्रांतीच म्हणावी लागेल. पण ही क्रांती आता तिचे उग्ररूप दाखवू लागली आहे. तिचे अवगुण समोर येऊ लागले आहेत. या मोबाईल सांकृतीने लोकांच्या आयुष्यात मोठा बदल केला आहे, असे म्हणणेही वावगे ठरू नये. एक वेळ पोटासाठी रोटी नसेल तर चालेल, पण मोबाइलचा डेटा हवाच ही मानसिकता सर्वत्र बनलेली आहे. दिवसरात्र सर्वजणच या मोबाइलमध्ये माना खुपसून बसल्याचे चित्र कुठेही दिसते. मोबाइलचे हे व्यसन आता आरोग्याला चांगले घातक ठरत असले तरी त्याबद्दल विचार करावयाससुद्धा कोणाला वेळ नाही अथवा तशी मानसिकता दिसत नाही. आज मोबाइलने जेवढे आपले आयुष्य सोपे केले आहे तेवढेच त्याचे दुष्परिणामसुद्धा पाहायला मिळत आहेत. जर वेळीच मोबाइलचा अति वापर थांबवला नाही तर यामुळे शरीरावर अनेक परिणाम दिसू शकतात. एका अभ्यासानुसार मोबाइलच्या वापरामुळे मेंदूच्या कर्करोगाचा (ब्रेन कॅन्सर) धोका वाढत असल्याचे निष्पन्न झाल्याने याबाबत आता गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे. असे असले तरी मोबाइलमुळे मेंदूचा कर्करोग होऊ शकत नाही, असा दावाही मोठ्या प्रमाणात करण्यात येत असल्याने सध्या सर्वत्र गोंधळाचे वातावरण आहे. मोबाइल सेवा देणाऱ्या कंपन्यांचे हे म्हणणे असले तरी त्याला कोणताही ठोस पुरावा देण्यात आलेला नाही, ही बाब विसरून चालणार नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मेंदूचा कर्करोग जरी होत नसला तरी अन्य आरोग्याशी संबंधित आजार वेगाने वाढत आहेत. मोबाइल कित्येकांसाठी एक व्यसन बनला आहे. जवळपास सर्वच लहान मुलं मोबाइलशिवाय जेवत नाहीत आणि अनेक तरुणांचा रील्स स्क्रोल केल्याशिवाय दिवस जात नाही, हे चित्र सर्वत्र आहे. परंतु या मोबाइलच्या सतत वापरामुळे आपल्या डोळ्यांची दृष्टी कमी होतेच, पण शरीरालासुद्धा याचा फटका बसतो. अनेक लहान मुलांना मोबाइलमुळे अगदी कोवळ्या वयातच चष्मे लागत आहेत. कितीतरी तरुण रात्री १-२ वाजेपर्यंत मोबाइलवर ऑनलाइन असतात. अनेकांसाठी ही गोष्ट सामान्य जरी असली तरी हे असे रोज करणे शरीरासाठी धोकादायक ठरत आहे. सतत मोबाइल नोटिफिकेशनमुळे किंवा मेसेजमुळे वाजणे तुमची स्ट्रेस लेवल वाढवू शकते. आता तुम्ही म्हणाल हे कसे शक्य आहे. परंतु एखाद्या व्यक्तीचा मेसेज आल्यानंतर त्याचा मेसेज वेळेत पाहता न आल्याने किंवा त्या व्यक्तीचे वेळेत उत्तर न आल्याने आपल्यातील तणाव वाढण्याची जास्त शक्यता आहे, असे अनेक तज्ज्ञांचे म्हणणे आहे. मोबाइल फोनमुळे मेंदूचा कर्करोग होऊ शकतो, अशी बाब समोर आली आणि ती दीर्घकाळापासूनची चिंता आहे. मोबाइल फोन आणि वायरलेस तंत्रज्ञान अधिक व्यापकपणे आपल्या दैनंदिन जीवनाचा एक प्रमुख भाग ठरत आहे. त्यामुळे याबाबतची सत्यता तपासून पाहणे वैज्ञानिकदृष्ट्या महत्त्वाचे होते. मात्र वर्षानुवर्षापासून मोबाइल फोन रेडिओ लहरी आणि मेंदूचा कर्करोग याविषयी तज्ज्ञांद्वारे वर्तविलेल्या भीतीसारखे कोणतेही कारण नसल्याचे एका अभ्यासातून समोर आले आहे. कॉलवर बोलताना अनेकदा मोबाइल कान आणि डोक्याच्या एका भागावर धरला जातो. मोबाइलमधून रेडिओ लहरी उत्सर्जित होतात. बहुतेक व्यक्तींकडून मोबाइल फोन वापरताना अनेकदा डोक्याजवळ धरले जातात आणि मोबाइल फोन रेडिओ लहरी उत्सर्जित करतात. असे असले तरी या विषयावर आजही अनेक मत-मतांतरे आहेत. काही वर्षांपूर्वी इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सरने रेडिओ लहरी मनुष्यप्राण्यासाठी अतिशय घातक असल्याचे अर्थात कार्सिनोजेन असल्याचे सांगितले होते. कार्सिनोजेन म्हणजे असे घटक जे कॅन्सरचा धोका वाढवू शकतात. ही माहिती समोर आल्यानंतरच गैरसमज झाला आणि त्यामुळे चिंता वाढत गेली. आयएआरसी ही जागतिक आरोग्य संघटनेचा भाग आहे. संभाव्य कार्सिनोजेन म्हणून रेडिओ लहरींचे त्यांचे वर्गीकरण मुख्यत्वे मानवी निरीक्षण अभ्यासातील काही मर्यादित पुराव्यावर आधारित होते. अर्थात हा दावा अनेकदा खोडून काढण्यात आला असला तरी खरच मोबाइलचा अतिवापर हा धोकादायक ठरत आहे का, याबाबत अजूनही सखोल संशोधन करणे आवश्यक ठरत आहे. मोबाइलचा प्रचंड वापर सर्व वयोगटांतील लोकांमध्ये कमी झालेल्या शारीरिक हालचालींशी संबंधित आहे. हल्ली लोक सोशल मीडियावर रील्स बघणे आणि ऑनलाइन गेम खेळणे यात व्यस्त असतात. परिणामी लठ्ठपणा, हृदयाचे विकार आणि हाड-स्नायूशी संबंधित समस्या उद्भवण्याची शक्यता वाढते. ज्या मोबाइलने आपल्या सर्वांना डिजिटल आयुष्यात जवळ आणले त्यानेच खऱ्या आयुष्यात अनेकांना लांब नेले आहे. ऑनलाइन चॅटिंगमुळे कित्येक जणांना प्रत्यक्षात नीट बोलता येत नाही. आपण नेहमी ऐकतो की माणूस हा समाजशील प्राणी आहे, पण मोबाइलचा अतिवापर आज माणसाला एकटा पाडत आहे. स्मार्टफोनच्या अतिवापरामुळे झोपेवर, स्मरणशक्तीवर आणि बौद्धिक क्षमतेवर परिणाम होऊ शकतो, असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे. अलीकडच्या काळात सांधेदुखीसह स्नायूंशी संबंधित अनेक समस्या वाढल्या आहेत. लहान मुले स्मार्टफोनचा गरजेपेक्षा जास्त वापर करीत आहेत. त्यामुळे लहान मुलांमध्ये हे स्नायूंशी संबंधित आजार वाढत असल्याचे पाहायला मिळते. स्मार्टफोन हा सर्वसामान्यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. लोक ऑफिसचे काम करण्यासाठी, सोशल मीडिया वापरण्यासाठी अशा असंख्य कामांसाठी फोनचा वापर करीत असतात. मोबाइल फोनचा दीर्घकाळ वापर केल्याने एखाद्या व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक स्थितीवर परिणाम होऊ शकतो. सतत स्मार्टफोन वापरल्यामुळे हात आणि मनगटांमध्ये वेदना होतात. तेव्हा हातांना मुंग्या येणे, हात सुन्न पडणे अशा गोष्टी घडू शकतात, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. स्मार्टफोन हातामध्ये पकडून राहिल्याने स्नायू आणि हाडांवर ताण येण्याच्या घटना वाढत आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे दररोज दोन ते तीन तासांपेक्षा जास्त वेळ स्मार्टफोन वापरल्याने मान, खांदे असे अवयव दुखू शकतात. त्याशिवाय पाठदुखीचा त्रासदेखील होऊ शकतो. झोपून फोन वापरत असल्यास हा त्रास वाढण्याची भीती आहे. एकीकडे मोबाइलच्या अति वापराने मेंदूचा कर्करोग होतो की नाही, याबाबत अनेक वाद- विवाद असले तरी हा स्मार्ट फोन अनेक आजार अनेकांच्या आयुष्यात घेऊन येत आहे, याकडे कानाडोळा करणे ही मोठी चूक ठरू शकते. आणखी मोठी चूक घडून तमाम भारतीयांना याचे नुकसान होण्याआधी शासकीय यंत्रणेवर योग्य वेळेत उपाययोजना होणे गरजेचे आहे. लोकांच्या आरोग्याविषयी असलेल्या शंका वेळेच तपासून दूर करायला हव्यात. ही सेवा आवश्यक असले तरी ती जीवघेणी नसावी. त्यामुळे शासकीय स्तरावर या यंत्रणेचा अधिक अभ्यास होणे आवश्यक असल्याने शासनाने ती भूमिका तातडीने बजवायला हवी. लोकांच्या आरोग्याला बाधा पोहोचणार असेल तर अशा क्रांतीला वेळीच थपवणे आवश्यक आहे.

# बहुरंगी व्यक्तिमत्वाचे प्रबोधनकार



**शब्दांनाही** कोडं पडावं अस व्यक्तिमत्व असलेले केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार यांचा जन्म १७ सप्टेम्बर १८८५ रोजी पनवेल येथे झाला .यांनी शब्दांना एकत्र गुंफून आपल्या लेखणी आणी वाणीच्या माध्यमातून आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे .अनेक क्षेत्रांत पारंगत असलेल्या व्यक्तीस अष्टपैलू म्हणतात परंतु प्रबोधनकार थोर विचारवंत , समाजसुधारक , पत्रकार , साहित्यिक, भाषातज्ञ, सम्पादक, चित्रकार, आशा विविध भूमिकांत वावरत असल्याने त्यांचे व्यक्तिमत्व बहुरंगी होते असेच म्हणावे लागेल .त्यांनी संत तुकाराम, श्यामची आई, या चित्रपटात भूमिका केली होती. सामजिक सुधारणा हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय होते.अन्याय्य रुढी , परम्परा , जाती -व्यवस्था आणी अस्पृश्यता निवारण करण्यासाठी वक्तृत्व , लेखन आणी प्रत्यक्ष कृती ही तीन शस्त्रे वापरून त्यांनी पुराणमतवाद्यांशी लढा दिला .त्यांची खरा ब्राम्हण आणी टाकलेले पोर ही दोन नाटके समाजसुधारणांसाठी क्रांतिकारक ठरली .

प्रबोधनकार यांनी ध्येय प्राप्तीसाठी कधीच कोणतीही तडजोड केली नाही .त्यांच्या लढ्यापासून परावृत करण्यासाठी अनेकांनी प्रयत्नं केला , अनेक आमिषे दाखवली पण प्रबोधनकारांनी कशाला दाद दिली नाही .प्रबोधनकारांनी सारथी , लोकहितवादी , प्रबोधन ह्या नियतकालिकांच्या माध्यमातून आधुनिक विचारांचा प्रचार केला .राजर्षी शाहू महाराज यांचे ते निकटवर्ती होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळ हा त्यांच्या जीवनातील सर्वात महत्वाचा लढा होता .त्यात त्यांनी प्रल्हाद केशव अत्रे , कॉम्रेड भाई डांगे यांच्या बरोबरीने काम केले.या चळवळीत त्यांनी वेगवेगळ्या विचारांच्या व्यक्ती आणी पक्ष यांना एकत्र बांधून ठेवण्यात यश मिळवले .या आंदोलनात त्यांना करावास भोगावा लागला. कोदंडाचा टणत्कार, भिक्षूकशाहीचे बंड, देवांचा धर्म की धर्माची देवळे, ग्रामण्याचा इतिहास, कुमारिकांचे शाप , वक्तृत्व शास्त्र, ग्रंथासह समर्थ रामदास, संत गाडगे महाराज, रंगो बापूजी, पंडिता रमाबाई ह्यांची चरित्र लिहली आहे. माझी जीवनगाथा हे आत्मचरित्र लिहिले आहे. त्यांचे कार्य पाहिल्यानंतर सहज म्हणावेसे वाटते की ,

**शब्दांशी नाते तुमचे**
**शब्दांचे गाणे गाता**
**जगाची वेदना सारी**
**शब्दांत मांडून जाता**

प्रबोधनकरांनी २० नोव्हेंबर १९७३ रोजी मुम्बई येथे जगाचा निरोप घेतला असला तरी कार्यरुपाने ते अजरामर झाले आहेत .

**- दिलीप प्रभाकर गडकरी, कर्जत**

# मोदी, भागवतांचा निषेध कोण करणार...?

**अमेरिका** दौऱ्यावर असलेले देशाचे विरोधी पक्षनेते राहूल गांधी यांच्या आरक्षणविरोधी कथित वक्तव्याचा आधार घेत भाजपने निषेध व्यक्त करत आपला आत्मा शांत केलेला दिसतो आहे. जॉर्ज टाऊन युनिर्व्हसिटीतील विद्यार्थ्यांपुढे राहुल गांधी आपलं मत मांडत असताना त्यांना देशातील आरक्षण केव्हा संपणार असा प्रश्न करण्यात आला. या प्रश्नाच्या उत्तरात राहुल यांनी देशात आरक्षणाची निष्पक्षता येईल तेव्हाच याचा विचार करता येईल, असं उत्तर दिलं. उत्तर अगदी सोपं होतं. आरक्षण संपवावं अशी भारतातील आजची परिस्थिती नाही. ती जेव्हा येईल तेव्हा त्याचा विचार केला जाईल, असं त्यांनी स्पष्ट केलं. राहुल यांचं हे वक्तव्य आपल्या पध्दतीने वाकवून भाजपने आपला ऊर बडवून घेतला. आता हेच भाजपवाले आरक्षणाच्या मुद्यावर कोणाकोणाचा निषेध नोंदवणार आहेत, असा त्यांना उघड सवाल आहे. राहूल यांनी आरक्षण संपवण्याची थेट भाषा केली असेल तर त्यांचा निषेध व्हायलाच हवा. पण तोही निषेध करण्याचा भाजपच्या नेत्यांना अधिकार नाही, हे त्यांनी लक्षात घ्यावं. हा अधिकार ज्यांच्यासाठी आरक्षण आहे त्यांचा होय. त्यांनी तो भाजपला दिलेला नाही. तेव्हा मागासवर्गीयांचे आपण तारणहार आहोत असं दाखवण्याचा छद्मीपणा भाजप आणि त्यांच्या नेत्यांनी करू नये. ज्या भाजपने निषेध व्यक्त करून आपली छाती बडवून घेतली ते भाजपवाले याच मुद्यावर कोणाकोणाचा निषेध करणार आहेत? आपल्यावरील आपत्ती दूर लोटण्यासाठी भाजपवाले कोणत्याही मुद्याला कसलाही मुलामा देत असतात हा आजवरचा अनुभव आहे. याच अनुभवाचा कित्ता त्या पक्षाच्या नेत्यांनी राहुल यांच्या वक्तव्यावर गिरवला आहे. मागे बिनडोक कार्यकर्ते असताना तमाशा होणारच. विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या वक्तव्यांची तोडमोड करायची आणि आपलं इप्सित साध्य करायचे धंदे भाजपने आजूनही सोडलेले नाहीत. लोकसभा निवडणुकीने त्या पक्षाची लाज रस्त्यावर आणूनही नेते मात्र शहाणे होण्याचं नाव घेत नाहीत. रवीशंकर प्रसादांसारखे खोटारडे नेते यात माहीर आहेतच. पण ज्या आयटीसेलने राहुल यांच्या वक्तव्यांची खोटी माहिती दिली त्या सेलच्या प्रमुखाची विश्वासार्हता केव्हाच गेली आहे. या सेलचा प्रमुख असलेल्या अमित मालवीय याच्यावर झालेल्या महिला आणि मुलींच्या शोषणाच्या आरोपाने सेलचे बारा वाजलेच आहेत. मालवीय नावाचा हा माणूस इतका विकृत आहे की त्याच्या या कृत्यांमुळेच देशात अनेक ठिकाणी दंगली पसरण्याची परिस्थिती





निर्माण झाल्याचं सेलमधील माजी कर्मचारी सांगू लागले आहेत. हा माणूस विरोधकांच्या एखाद्या वक्त्यवाची हेराफेरी करून देशात वैर निर्माण करत असल्याच्या असंख्य तक्रारी याच सेलमध्ये काम करणाऱ्यांनी केल्या आणि ते बाहेरही पडले.

**प्रविण पुरो**


ज्या भाजपने राहुल गांधींचा निषेध केला त्या भाजपची आरक्षणविषयीची भूमिका काय हे जगाला चांगली ठावूक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेल्या संविधानाला भाजपची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने कधीही आपलं मानलं नाही. संघाच्या आजवरच्या सरसंघचालकांनी आरक्षणाविरोधी आपली मतं जाहीरपणे मांडली आहेत. विद्यमान प्रमुख मोहन भागवत यांनी तर आरक्षण संपवलं पाहिजे, असं जाहीर वक्तव्य केलं. आपल्या सोयीचं नसल्याने भाजप नेत्यांनी ते जाणीवपूर्वक नजरेआडे केलं. आपल्याच नेत्याला विरोध कसा करणार असा प्रश्न त्यांच्यापुढे असावा. जातनिहाय जनगणनेला विरोध हा भाजपचा अजेंडा राहिला आहे. अशी जनगणना झाली तर देशातील ओबीसींची संख्या किती हे स्पष्ट होईल आणि त्यामुळे सध्या असलेलं आरक्षण 50 टक्क्यांहून पुढे जाईल, ही भाजपची खरी भीती आहे. याच भीतीने पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आरक्षणाची उघडपणे खिल्ली उडवली. आरक्षण संपवणं हे माझ्यापुढचं उद्दीष्ट असल्याचं त्यांनी जाहीरपणे नमूद केलेलं कोणी विसरू शकत नाही. मात्र त्यांचा निषेध करण्याची हिंमत भाजपच्या एकाही नेत्याकडे नाही. आपल्या पंतप्रधानाचीच आरक्षणाबाबत अशी भूमिका असेल तर कर्नाटकचे अनंतकुमार हेगडे, राजस्थानच्या ज्योती मिर्झा, मेरठचा खासदार अरूण गोवील यांना तर आरक्षणाविरोधी बोलण्याचा अधिकारच जणू प्राप्त झाला आहे. संविधान बदलण्याची भूमिका म्हणजे आरक्षण संपवण्याची उघड भाषा होय. ती वापरणाऱ्या या मंडळींना भाजपच्या एकाही नेत्याने जाब विचारल्याचं कोणी पाहिलं नाही. भाजप किती दुटप्पी आहे, याचं हे ज्वलंत उदाहरण होय. आपलं ठेवायचं झाकून आणि दुसऱ्याचं पहायचं वाकून ही भाजपची जुनीच खोड होय. ती लागलीच मोडेल असं नाही. हा खोटेपणा फारकाळ चालत नसतो. लोकांना आता खरं काय आणि खोटं काय हे कळतं. तितकं तारतम्य लोकांमध्ये आलेलं आहे. तेव्हा ऊर बडवला म्हणून लोकं आपल्याशी सहमत आहेत, असं नाही. आरक्षणाविषयीची भूमिका स्पष्ट असती तर भाजपच्या राजवटीत गुणरत्न सदावर्तेसारख्या बडबड करणाऱ्या व्यक्तीच्या खांद्यावर बंदूक ठेवून त्याला न्यायालयात जाण्याचा मार्गाला दाखवला नसता. हे उद्योग दुसरे तिसरे कोणाचे नव्हते. असल्या बाष्कळांना रस्त्यावर येऊन विरोध करायला कोणाला वेळ नाही. अशांची जागा लोकं संधी घेऊन दाखवून देतात. ती संधी लोकांनी लोकसभा निवडणुकीला साधली. आता राज्यात येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीतही त्याचं प्रत्यंतर येईल, हे भाजपने लक्षात घेतलं पाहिजे.

ज्या आरक्षणासाठी भाजपवाले रस्त्यावर उतरले त्याच आरक्षणाच्या मुद्यावर आपल्या सरकारला जाब विचारायची हिंमत त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कधी दाखवली नाही. केंद्राने अवलंबलल्या खासगीकरणाच्या निमित्ताने आरक्षणाची कशी वासलात लावण्यात आली, त्याची असंख्य उदाहरणं देता येतील. सरकारी उद्योगात आरक्षणाचा हक्क मागासवर्गीयांना घटनेने दिला आहे. हे आरक्षण सहज संपवता येत नाही, हे लक्षात आल्यापासून भाजपची सत्ता खुष्कीचा मार्ग शोधत होती. खासगीकरणाच्या धोरणाचा यासाठी पध्दतशीर वापर करून घेण्यात आला. आणि खासगी उद्योगात मागासवर्गीयांना खड्यासारखं दूर करण्यात आलं. मागास आणि इतर मागासांना मिळू शकतील अशा लाखोंच्या संख्येने नोकऱ्यांवर या वर्गाला पाणी सोडावं लागलं आहे. मागासवर्गीयांचं हे नुकसान भाजपच्या नेत्यांना दिसत नाही? आरक्षणाचे खरे मारेकरी कोण हे यावरून स्पष्ट दिसतं. केंद्रातच्या भरती प्रक्रियेत मागासवर्गीयांचा टक्का नसणं, सरकारच्या सचिवालयात एकही मागास अधिकारी नाही, याची लाज सत्तेला नसेल तर त्यांना इतरांकडे बोट दाखवायला अधिकार राहत नाही.

आपल्यावर आलेलं बालंट दूर लोटण्यासाठी भाजप अशा मुद्यांचा खुबीने वापर करत असल्याचं अनेकदा दिसून आलं आहे. राजकोटच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा दुर्घटनेने भाजपचं तोंड पोळून निघालं आहे. शिवरायांचा पुतळा पडणं हा केवळ अपघात नव्हे तर त्यामागे असलेल्या कमाईच्या विकृतीने हा सारा प्रकार झाल्याचं स्पष्ट दिसतं. यामागच्या भ्रष्टाचाराचा पोलखोल होईल तेव्हा भाजप नेत्यांना तोंड दाखवायला जागा राहणार नाही. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुत्राच्या वाहन अपघाताची कथा तर आता सर्वदूर पोहोचलीच आहे. एव्हाना गोमांस खायला बंदी घालणाऱ्या नेत्याच्याच मुलाने बीफ सेवन केल्याचं उघड झाल्याने या नेत्यासह भाजपचं थोबाड फुटलं आहे. खोटे इमले उभारणाऱ्या नेत्यांची ही पापं धुवून काढण्यासाठी ते कोणत्याही मार्गाचा आधार घेऊ शकतात, याची जाणीव होतीच. राहुल गांधी यांचं भाषण हे त्यासाठी खुराक बनलं. अर्थात अशी गोष्ट थांबणारी नाही. भाषण कितीही चांगलं करा भाजपच्या बोलघेवड्यांपुढे त्याला किंमत नाही. आपल्या नेहमीच्या शैलीत राहुल यांच्या भाषणाची तोडमोड करून ते बाहेर काढण्यात आलं. जो पक्ष आपल्याच पंतप्रधानांच्या बटाट्यातून सोनं काढण्याची कला राहुल यांच्या तोंडी खपवू शकतो तो काहीही करू शकतो, हे आता सर्वांनाच कळून चुकलं आहे. तेव्हा आरक्षणाचा उगाच आव आणून लोकांना वेडं बनवण्याचे उद्योग भाजपने सोडून द्यावे हेच पक्षाच्या भल्याचं आहे.

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार-राजकीय विश्लेषक आहेत.)**

## गणेश स्तुती



कार्यारंभी तुझे स्मरण हे।
करितो गणराया।
कृपाप्रसादे बुद्धी मती दे।
ही तुझी स्तुती गाया ॥धृ॥

रिद्धी सिद्धी महा सरस्वती।
तुझी सेवा करिती।
चौसष्ट कला चौदा विद्या।
तव पदी लीन अती ॥धृ॥

येई धावत नाचत खेळत।
रंगी रंगाया।
कला नाट्य अन नृत्य विशारद।
सभेसी तुम्ही या या।

सिंदुर चर्चित रूप मनोहर।
पायी घागरीया।
साज ल्यायला तू गणेशोत्सवी।
विनायका मोरया ॥धृ॥

आनंदाने पूजा स्वीकारूनी।
कृपावंत व्हावे।
काव्य रूप हे मोदकअर्पि।
मी अती मनोभावे ॥धृ॥

**प्रवीण पांडे**
**अकोला**
**९९२२५१६०५५**

## पत्र मानस

### योग्य परराष्ट्रनीतीचा परिणाम !

सर्वार्थाने वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या राज्यघटनेत भारतीय संस्कृतीचे सार सामावलेले आहे. सामाजिक न्यायाचे तत्व संविधानात अंतर्भूत असल्याने राज्यघटनेचा गाभा सत्ताधाऱ्यांनीच समजून घेणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान मोठे असल्याचे फक्त म्हटले जाते. परंतु वास्तवात तसे नसल्याचे प्रकर्षाने दिसते. विद्यमान सत्ताधारी आरक्षण, हा भारतीय राज्यघटनेचा आत्मा असल्याचे मान्य करतात. परंतु प्रत्यक्षात मात्र आरक्षणाला विरोध करतात, हे विसंगत वाटते. लोकशाहीचा अभिमान बाळगत विविधतेत एकता असल्याचा साक्षात्कार झाला, हे ऐकून बरे वाटले. गेल्या दहा वर्षात या सर्वांचा विसर पडून सत्तेच्या नशेत हुकूमशाहीकडे होणारी देशाची वाटचाल, आता काहीशी मागे पडेल अशी आशा वाटते. दुर्दैवाने आज देशात सत्ताधारी संविधानाला अपेक्षित राज्यकारभार करीत नसून लोकशाहीचाच गळा घोटताना दिसतात. अनेकदा त्यांची घटनाबाह्य कृती प्रकर्षाने दिसून आली आहे. तेव्हा मात्र संविधानाचा विसर पडतो. शालेय पुस्तकातून नागरिकशास्त्राला वगळण्याचे धोरण मात्र पटत नाही. एकीकडे राज्यघटनेचे गुणगान गायचे व दुसरीकडे त्याच्याविरुद्ध कारभार करायचा हे योग्य नाही. परिणामी सत्ताधाऱ्यांनी स्वायत्त यंत्रणांचा गैरवापर करून लोकशाही तत्त्वांना तिलांजली देत लोकशाही व स्वातंत्र्याचा गळा आवळला आहे. सत्तेच्या जोरावर केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करून विरोधकांना खोट्या गुन्ह्यात अडकवून, तुरुंगात डांबणे आता सर्वोच्च न्यायालयाने चपराक देताच सरकारच्या अंगाशी आली आहे. न्याय मिळविण्यासाठी महिनोनमहिने तुरुंगात खितपत पडणे हे मानवी हक्क व स्वातंत्र्याची पायमल्लीच आहे. राज्यपालांची मनमानी सुरू असणे हेही लोकशाहीला धरून नाही. त्यावर कोणीच काही बोलत नाही. त्यामुळेच पिंजऱ्यातील पोपटांचे आयतेच फवले आहे. मग राज्यघटनेचे उदात्तीकरण करून कोणता हेतू साध्य होणार ? की जनतेत दाखवण्यापुरते लोकशाही दिन, संविधान दिन साजरे करायचे ? यातून भावी पिढीला कोणती प्रेरणा मिळेल ? अर्थात जेव्हा सत्ताधारी पक्ष प्रामाणिकपणे लोकशाही प्रणाली व संविधान अमलात आणतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने संविधान मंदिरे प्रेरणादायी ठरतील असे वाटते.

**- पांडुरंग भाबल,भांडुप**

पनवेल: गेली ६३ वर्षे अखंडपणे आयोजित करण्यात येत असलेल्या पनवेल मधील मदन कोळी व परिवार यांच्या गणेशोत्सवास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत श्री. गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांचे कोळी परिवाराच्यावतीने स्वागत सत्कार करण्यात आले.





धनश्री किशोर पानसरे, चुनाभट्टी यांच्या घरातील श्रींची मूर्ती



अंकुश शांताराम पार्टे यांच्या घरातील श्रीगणेश मुर्ती यंदा 25 वर्ष निमित्ताने लाडक्या बाप्पाला 56 प्रसादाचा भोग ही चढवण्यात आला आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस चे जिल्हा सरचिटणीस रवी गुप्ता यांच्या गोरेगाव येथील निवासस्थानी श्रींची स्थापना करून श्रद्धा पूर्वक पूजा अर्चा करण्यात येत आहे.



दत्ताराम धोंडी अमृते यांच्या सावंतवाडी वेर्ले येथील श्रींची मूर्ती

# कोपर स्थानकाजवळील बेकायदा गाळ्यांना नोटिसा

## रेल्वे मार्गातील जिना बंद करून गाळ्यांची उभारणी

**प्रतिनिधी**
**डोंबिवली**

कोपर पूर्व रेल्वे स्थानकाजवळील जिन्याचा मार्ग बंद करून उभारण्यात आलेल्या तीन बेकायदा गाळ्यांना ग प्रभागाच्या साहाय्यक आयुक्तांनी तातडीने नोटिसा बजावल्या आहेत. या गाळे मालकांना त्यांच्या जमीन मालकी, बांधकाम परवानगीची कागदपत्रे सादर करण्यात सांगण्यात आली आहेत. ही कागदपत्रे येत्या सात दिवसाच्या कालावधीत गाळे मालकांनी सादर केली नाहीतर तिन्ही गाळे पालिकेकडून भुईसपाट केले जाणार आहेत.



कोपर पूर्व रेल्वे स्थानक भागात (आयरे परिसर) भूमाफियांनी गणपती सुट्टीच्या कालावधीत बेकायदा गाळे उभारल्या आहेत, अशा तक्रारी पालिकेच्या ग प्रभागाकडे आल्या होत्या. गणपतीची पालिकेला सुट्टी असल्याने त्याचा गैरफायदा भूमाफियांनी घेतला असल्याची चर्चा होती. या गाळयांना सुशोभित करून तेथे आर. के. एन्टरप्रायझेस हे घर, गाळयांची विक्री करणारे कार्यालय माफियांनी सुरू केले आहे. रेल्वे जिन्याच्या मार्गात, प्रवाशांच्या जाण्याच्या मार्गात बेकायदा गाळे उभारण्यात आल्याने या भागातील नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती.

आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी या बेकायदा बांधकामाची गंभीर दखल घेतली. याप्रकरणी परिमंडळ उपायुक्त व्दासे यांना या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालण्याचे आदेश दिले. ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत यांनी वरिष्ठांच्या आदेशावरून बेकायदा गाळे उभारलेल्या जागेची पाहणी केली. स्थानिकांनी हे गाळे जुने असल्याचे आणि कार्यालय सजावट आता केली असल्याचे सांगितले. या गाळयांचा कोणीही जमीन मालक, चालक घटनास्थळी उपस्थित नव्हता. त्यांची नावे, पत्ते देण्यास स्थानिक रहिवासी असमर्थतता दर्शवत होते.

अखेर साहाय्यक आयुक्त कुमावत यांनी तिन्ही गाळे मालकांच्या गाळयांवर नोटिसा लावून येत्या सात दिवसात गाळयांची जमीन मालकी, बांधकामांची कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिले. गाळे मालकांनी या कालावधीत पालिकेला संपर्क केला नाहीतर त्यांचे गाळे भुईसपाट करण्यात येणार आहेत. अशाप्रकारे पालिका, रेल्वेच्या जागा हडप करून भूमाफिया या गाळयांमध्ये कार्यालये सुरू करतात. तेथून चाळ, इमारती मधील बेकायदा घरे, गाळयांची विक्री करतात, अशा तक्रारी आहेत.

भूमाफियांनी आपले म्हणणे वेळेत सादर केले नाहीतर तातडीने हे बेकायदा गाळे पालिकेने जमीनदोस्त करावेत, अशी स्थानिकांची मागणी आहे.

# मजुरीत 200 रुपये दिले कमी दिल्याने मजुराची डोक्यात हातोडा घालून हत्या

**प्रतिनिधी**
**अंबरनाथ**

ठेकेदार मालकाकडून कामाचा ठेका घेतात. मजुरांना कामावर ठेवतात आणि त्यांना मजुरी देतात. पण कामापेक्षा कमी मुजरी देणं एका ठेकेदाराच्या जीवावर बेतलं आहे. मजुरीचे पैसे कमी देत असल्याने मजूर आणि ठेकेदार यांच्यात वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की त्यात ठेकेदाराचा मृत्यू झाला. याप्रकरणी आरोपी मजुराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मजुराने मुकादमाच्या डोक्यात हातोडा घालून हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. अंबरनाथच्या वडवली सेक्शन परिसरातील निर्माणाधिन इमारती मध्ये घडला आहे. याप्रकरणी शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला पोलिसांनी अटक केली. पूर्वेच्या वडवली सेक्शन परिसरातील दत्त साई कॉ. ऑप. हाऊसिंग सोसायटीच्या इमारतिचं पुनर्विकासाठी निष्कासन कार्य सुरू आहे. निर्माणाधिन इमारतीचे अंतर्गत पाडकाम सुरु असून याठिकाणी पश्चिम बंगाल राज्यातून आलेले तीन मजूर काम करून तिथेच राहत होते.

मुकादम असलेला अब्दुल रेहमान याची त्याच्यासोबत राहत असलेला मजूर सलीम शेख याने डोक्यात हातोडा घालून हत्या केली, मृत अब्दुल रेहमान, सलीम शेख आणि मोहम्मद अली हे तिघे पश्चिम बंगाल राज्यातील रहिवासी असून ते दत्त साई कॉ. ऑप. सोसायटीच्या इमारतीमध्ये काम करीत होते.

# ठाणे महापालिकेच्या नवीन प्रस्तावित इमारतीच्या आवारात, नागरीहिताच्या आंदोलनांसाठी जागा उपलब्ध करुन द्या!

## 'धर्मराज्य'ची महापालिका आयुक्तांकडे मागणी

**प्रतिनिधी**
**ठाणे**

ठाणे महानगरपालिकेची नवीन प्रस्तावित इमारत, रेमण्ड कंपनीच्या राखीव भूखंडावर उभारण्यास महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिलेली आहे. वर्ष-१९८२ मध्ये ठाणे महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर, वर्ष-१९८९ मध्ये, पाचपाखाडी येथील सध्याची इमारत कार्यान्वित झाली. मात्र, नंतरच्या काळात ठाणे शहराची लोकसंख्या प्रचंड वाढल्याने, विद्यमान इमारतीमधून प्रशासकीय कारभार चालविणे गैरसोयीचे ठरु लागले. तसेच, विभागनिहाय कामकाज करण्यासाठी, इमारत अपुरी पडू लागली. याच पार्श्वभूमीवर, ठाणे महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या ८ एकरच्या भूखंडावर, तब्बल ३२ मजली भव्य इमारत उभारण्यास महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली आहे. सुमारे ५७२ कोटी रुपयांची निविदा याकामी काढण्यात येऊन, शासनाकडून २५० कोटी रुपये मंजूरही करण्यात आलेले आहेत.

आजमितीस ठाणे शहराची लोकसंख्या ही, २० लाखांहून अधिक असून, नगरसेवकांची संख्या १३१ एवढी झालेली आहे. एकंदरीतच ठाणे महापालिका प्रशासनाचा कारभार हा, पूर्वापेक्षा अधिक विस्तारित झालेला असल्याकारणाने, ठाणे शहराचे कामकाज चालविण्यासाठी प्रशस्त इमारतीची आवश्यकता होतीच, ती आता नवीन प्रस्तावित प्रशासकीय इमारतीच्या माध्यमातून साध्य होईल. याच अनुषंगाने, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव यांना पत्र पाठविण्यात आले असून, पक्षाचे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, आपल्या पत्रात आयुक्तांना सूचित केले आहे की, ठाणे महानगरपालिकेची प्रस्तावित इमारत जरी भव्यदिव्य स्वरुपात उभारण्यात येत असली तरी, प्रशासनाचा वादग्रस्त कारभार, विकासकामांचा खोळंबा, नागरी सोयी-सुविधांचा अभाव, भ्रष्टाचार आणि इतर मुलभूत प्रलंबित प्रश्न उपस्थित राहणारच आहेत. परिणामी, करदाते-कष्टकरी ठाणेकर नागरिक व सामाजिक/ राजकीय संस्था-संघटनांना, प्रशासनाच्या गैरकारभाराविरोधात आवाज उठविण्याचा, प्रसंगी प्रशासनाविरोधात आंदोलन करण्याचा घटनादत्त अधिकार आहे. तसा अधिकारच भारतीय लोकशाहीने सर्वसामान्य नागरिकांना दिलेला आहे. तोच अधिकार अबाधित राखण्यासाठी आणि जनतेचा आवाज, सत्ताधारी व प्रशासकीय व्यवस्थेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने, आंदोलनकर्त्यांसाठी प्रस्तावित इमारतीच्या आवारात अधिकृतपणे जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. सदर जागा ही, 'जनतेचे व्यासपीठ' किंवा 'जनता मंच' म्हणून ओळखली जाईल. अशाप्रकारचा प्रयोग महापालिका प्रशासनाने राबविल्यास, ठाणे शहर हे, एक आदर्श शहर म्हणून नव्याने नावारुपाला तर येईलच, त्याचबरोबर सर्वसामान्य नागरिकांना, लोकशाहीमार्गाने आंदोलनाचा, निषेध व्यक्त करण्याचा व सनदशीरपणे मोर्चा काढण्याचा अधिकार बहाल करणारी पहिलीवहिली स्वायत्त संस्था म्हणून, ठाणे महानगरपालिका ओळखली जाईल, याबाबत आमच्या मनात कोणताही संदेह नाही.

काहीवेळेस प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांची हातमिळवणी होऊन, घटनाविरोधी ठराव संमत होतात. अशावेळी कर्तव्यदक्ष नागरिकांनी आवाज उठविणे हे, क्रमप्राप्त ठरते.

# अनंत चतुर्दशी दिनी श्रीगणेशमूर्ती विसर्जनाचे नवी मुंबई महानगरपालिकेचे सुव्यवस्थित नियोजन

**प्रतिनिधी**
**नवी मुंबई**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील श्रीगणेशोत्सव 7 सप्टेंबर पासून अत्यंत उत्साहात संपन्न होत असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी महिनाभरापूर्वीच गणेशोत्सवासंबधी आढावा बैठकीप्रसंगी 'इकोफ्रेंडली प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव' साजरा करण्यातबाबत नागरिकांना केलेल्या आवाहनास उत्तम प्रतिसाद लाभलेला दिसून आला.

पीओपी ऐवजी शाडूच्या गणेशमूर्ती प्रतिष्ठापना करण्यास अनेक नागरिकांनी पसंती दर्शविली. शाडूच्या गणेशमूर्ती प्रतिष्ठापित करणा-या गणेशभक्तांना स्वच्छता व पर्यावरणमित्र म्हणून महानगरपालिकेमार्फत प्रशस्तीपत्र देऊन सर्व विसर्जनस्थळी सन्मानित करण्यात आले. नैसर्गिक जलस्त्रोतांचे रक्षण व्हावे यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आठही विभाग कार्यालय क्षेत्रात 137 इतक्या मोठया संख्येने कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात आली. पर्यावरणप्रेमी नागरिकांनी कृत्रिम तलावांमध्ये श्रीमूर्ती विसर्जनास मोठया प्रमाणावर पसंती दर्शविली.



नवी मुंबई महानगरपालिकेने 22 नैसर्गिक व 137 कृत्रिम अशा 159 विसर्जन स्थळांवर केलेल्या सुयोग्य व्यवस्थेमुळे श्रीगणेशोत्सवातील दीड दिवस, पाच दिवस, गौरीसह सहा दिवस व सात दिवस अशा चारही विसर्जन दिवशी श्रीमूर्ती विसर्जन अत्यंत सुव्यवस्थित रितीने संपन्न झाले.

या चार विसर्जन दिवशी 35720 श्रीमूर्तींना भावपूर्ण निरोप देण्यात आला. 17 सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीदिनी सार्वजनिक श्रीगणेशोत्सवांच्या आकाराने मोठ्या मूर्तींचे विसर्जन होणार असल्याने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका क्षेत्रातील सर्व विसर्जन स्थळांवर अधिक सक्षम व्यवस्था करण्यात येत आहे.

# वॉचमनची केली हत्या,आरोपीला अटक

**पनवेल**

लोखंडी पाईपने वॉचमेनच्या डोक्यात फटका मारून त्याची हत्या केल्याप्रकरणी आरोपीला कामोठे पोलिसांनी अटक केली. कृष्णकांत रामा पांडे (वय 29, राहणार मिर्झापूर, उत्तर प्रदेश) असे मृत इसमाचे नाव आहे. मृत कृष्णकांत पांडे हा आयुषी एम्पायर बांधकाम साईट, सेक्टर पाच, कामोठे या ठिकाणी वॉचमेन म्हणून काम करतो. त्या ठिकाणी सुतार काम करणारा छोटू कुमार रामश्रेष्ठ राय (वय 29, राहणार समस्तीपुर, बिहार) यांच्यात भांडण झाले होते. या भांडणांमध्ये छोटू कुमार याने लोखंडी पाईपने वॉचमेन कृष्णकांत याच्या डोक्यात फटका मारून त्याला जखमी केले. यात कृष्णकांत याचा मृत्यू झाला. आरोपी हा वारंवार ठिकाण बदलत असल्याचे समजून आले. पोलिसांच्या पथकाने आरोपी छोटू कुमार हा त्याच्या मूळ गावी बिहार राज्यात पळून जाण्याच्या तयारीत असताना त्याला लोकमान्य टिळक टर्मिनल येथे पकडून ताब्यात घेतले.

## मिरा भाईंदर महानगरपालिकातर्फे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत

# बूटकॅम्पमध्ये रोजगार इच्छुक उमेदवारांना विशेष प्रशिक्षण



**प्रतिनिधी**
**भाईंदर**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य शासनाची नुकताच जाहीर झालेली मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत बूटकॅम्प याचे आयोजन 13 सप्टेंबर दुपारी 3.00 वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन) भाईंदर (प.) येथे करण्यात आले होते. टेक महिंद्रा फाउंडेशन, मिरा भाईंदर महानगर पालिकेतील innovation cell आणि समाज कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या बूटकॅम्प या प्रशिक्षण कार्यशाळेत 100 रोजगार इच्छुक उमेदवार सहभागी झाले होते.

या बूटकॅम्प प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये श्रीम. दिपाली जोशी (समाज कल्याण विभाग अधिकारी) यांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने संदर्भात सखोल माहिती दिली तर श्रीम. कल्पिता पिंपळे (उपायुक्त) यांनी बूटकॅम्प प्रशिक्षण कार्यशाळेच्या संदर्भात माहिती देत या प्रशिक्षण कार्यशाळेचा लाभ घेतल्याबद्दल आभार मानून उपस्थित सर्व रोजगार इच्छूक उमेदवारांनी सदर मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने संदर्भात जनजागृती करणेबाबत व या योजनेत इतर युवक युवतींना सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करणेबाबत विनंती केली.

भविष्यात मिरा भाईंदर शहरातील रोजगार इच्छूक उमेदवारांनी पुढच्या होणाऱ्या बूटकॅम्प या प्रशिक्षण कार्यशाळेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा जेणेकरून भविष्यातील रोजगाराचा प्रश्न मार्गी लागुन मिरा भाईंदर शहरातील रोजगार इच्छूक उमेदवार सक्षम होतील आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेने आयोजित केलेल्या या बूटकॅम्पचा (first step in job market) हेतू साध्य होईल अशी भावना मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांनी व्यक्त केली.

# गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान डीजे वापरावर बंदी

**अलिबाग**

दहा दिवसांच्या पाहूणचार घेतल्यानंतर मंगळवारी गणेशोत्सवाची सांगता होणार आहे. या गणेश विसर्जन मिरवणूकी दरम्यान रायगड जिल्ह्यात डॉल्बी साऊंड सिस्टीम, लेझर बीम लाईट आणि स्नो स्प्रे, हीट स्प्रे यांच्या वापरावर जिल्हा प्रशासनाने यांनी निर्बंध घातले आहेत. याबाबतचे आदेश निवासी उप जिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी याबाबतची अधिसुचना जारी केली आहे. त्यामुळे विसर्जन मिरवणूकी दरम्यान आवाजाची मर्यादा गणेशभक्तांना सांभाळावी लागणार आहे. अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.

उत्सवप्रिय कोकणात उद्या गणेशोत्सवाची सांगता, लाडक्या गणेशाला उद्या वाजत गाजत निरोप दिला जाणार आहे, मात्र विसर्जन मिरवणूकी दरम्यान डॉल्बी साऊंण्ड सिस्टीम आणि लेझर बीम लाईट, तसेच स्नो स्प्रे या सारख्या साहित्याचा वापर करण्याचा विचार असेल तर तो आवरता घ्या, कारण असे करणे महागात पडू शकते. जिल्हा प्रशासनाने याबाबतची अधिसूनचा जारी केली आहे. लेझर लाईटमुळे डोळ्यांच्या पटलांना इजा होण्याची शक्यता असते, तर डीजेच्या आवाजामुळे बहिरेपणा आणि हृदयविकाराचे झटके येण्याच्या घटना घडल्या आहेत. यामुळे खबरदारी म्हणून प्रशासनाच्या वतीने याबाबतची अधिसूचना जारी केली आहे.

# अनंत चतुर्दशीच्या श्री गणेश विसर्जनासाठी महापालिका सज्ज !

**प्रतिनिधी**
**कल्याण**

अनंत चतुर्दशी दिवशी होणा-या श्री गणेश विसर्जनासाठी महापालिका सज्ज असून, कल्याण परिसरातील 22 नैसर्गिक विसर्जन स्थळी आणि 30 कृत्रिम विसर्जन स्थळांवर तसेच डोंबिवलीमध्ये 30 नैसर्गिक आणि 27 कृत्रिम विसर्जन स्थळांवर श्री गणेश विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे "विसर्जन आपल्या दारी" ही संकल्पना देखील महापालिकेच्या सर्व प्रभागात राबविली जाणार आहे.

महापालिकेच्या विद्युत विभागामार्फत एकूण 70 जनरेटर, 2735 हॅलोजन, 103 टॉवर लाईटिंग, 180 सीसीटीवी कॅमेरे यांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

महापालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत दुर्गाडी गणेशघाट येथे ठेकेदाराचे 16 कर्मचारी (गोताखोर) आणि अग्निशमन विभागातील 6 कर्मचारी, लाईफ बोट, लाईफ जॅकेट, रस्सी, रबर बोट इ. साधन सामुग्री उपलब्ध राहिल. त्याचप्रमाणे मोहने पंपींग स्टेशन गणेशघाट, यादवनगर गणेश घाट सिनेटरी अटाळी नदी, काळु नदी, वासुंद्री नदी, हनुमान मंदिर तलाव मांडा, बल्याणी तलाव, मोहिली पंप गणेश घाट, खारी आंबिवली गणेश घाट, गांधारी नदी, परिवहन गणेश घाट, गौरीपाडा तलाव, आधारवाडी तलाव, सापर्डे तलाव, उंबर्डे तलाव, नांदीवली व द्वारली तलाव, देवीचौक गणेश घाट, उमेशनगर, जुनी डोंबिवली गणेशघाट, कोपर तलाव, राजुनगर गणेशघाट, गणेशनगर खाडी, गोलवली तलाव, कुंभारखानपाडा तलाव गणेशघाट, लोढा संकुल /खाडी, निळजे तलाव, आयरेगाव तलाव, ठाकुर्ली चोळेगांव तलाव, भोईरवाडी तलाव व मोठा गाव गणेश घाट, इ. नैसर्गिक विसर्जन स्थळी देखील अग्निशमन विभागामार्फत सुविधा व कर्मचारी तैनात राहतील.

सर्व विसर्जन स्थळांवर घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत कर्मचा-यांचे नियोजन करण्यात आले असून, प्रमुख नैसर्गिक विसर्जन स्थळी, निर्माल्य कलश तसेच सजवलेली घंटागाडी उपलब्ध राहणार आहे. त्याचप्रमाणे कृत्रिम तलावाच्या ठिकाणी देखील निर्माल्य संकलनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता (शहर) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३९, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ म्हाडा व सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांचेकडे नोंदणीकृत पात्र मुंबई शहर जिल्हा मधील सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचेकडून एकुण ०५ कामाकरीता बी - १ (टक्केवारी ) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहे. विस्तृत निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. कुठलीही अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सविस्तर जाहिरात व कामांचा तपशिल www.mhada.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असेल. निविदा विक्री दिनांक १९.०९.२०२४ सकाळी १०.०५ पासून ते दिनांक २६.०९.२०२४ सायंकाळी ५.३५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (शहर) मुं.झो. सु. मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

CPRO/A/693

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

Follow us: @mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता (शहर),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई



इन्कलाबनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, जोगेश्वरी पूर्व. मंडळाचे यंदाचे ४३ वे वर्ष आहे.


पांडूरंग रामजी मोहिते तालुका लान्जा रत्नीगीरी यांच्या निवासस्थान ची श्री गणपती ची मूर्ति


शक्ती एस.आर.ए. सोसायटी, भाब्रेकरनगर, चारकोप, कांदिवली (प.) येथे प्रतिष्ठापित गणरायाची सुंदर मूर्ती.

# 'वंदे भारत ट्रेन'च्या माध्यमातून विकसित देशातील प्रवाशांना मिळणाऱ्या सुविधा भारतीयांना उपलब्ध- उपमुख्यमंत्री फडणवीस

## पुणे – कोल्हापूर, पुणे – हुबळी वंदे भारत एक्सप्रेसचा शुभारंभ

प्रतिनिधी
■ पुणे

वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेन ही भारताची शान असून विकसित देशातील प्रवाशांना ज्या प्रकारच्या प्रवासाच्या सुविधा मिळतात त्या सर्व सुविधा भारतीयांना या ट्रेनमधून मिळत आहेत, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणाली पद्धत्तीने हिरवा झेंडा दाखवून पुणे- हुबळी वंदे भारत एक्स्प्रेस रेल्वेसेवेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी पुणे रेल्वे स्थानक येथे आयोजित कार्यक्रमानंतर ते बोलत होते. या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार सुनील कांबळे, भीमराव तापकीर, माधुरी मिसाळ, विभागीय रेल्वे व्यवस्थापक





इंदू दुबे, पुणे मनपा आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राला पुणे- हुबळी, पुणे- कोल्हापूर आणि नागपूर सिकंदराबाद या तीन वंदे भारत रेल्वेची भेट दिली आहे. यामुळे महाराष्ट्रातील प्रवाशांचा प्रवास गतिमान आणि सुखकर होणार आहे. ही भारताने स्वत: आपल्या देशात तयार केलेली आंतरराष्ट्रीय दर्जाची ट्रेन आहे, असेही ते म्हणाले.

तत्पूर्वी केंद्रीय राज्यमंत्री श्री. मोहोळ म्हणाले की, देशामध्ये १६ वंदे भारत ट्रेनचे लोकार्पण होत असताना महाराष्ट्रात तीन आणि पुण्यासाठी दोन ट्रेन सुरू होत असल्याची पुणे शहरासाठी आनंदाची बाब आहे. गेल्या दहा वर्षात रेल्वेच्या विकासासाठी २३ लाख ६४ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्यामध्ये नवीन रेल्वे स्थानकांची कामे, अमृत योजना, आदर्श रेल्वे स्थानक आदी अनेक कामे सुरू असून जवळपास १ हजार ६४ स्थानकांचा कायापालट त्यांच्या नवीनीकरणाच्या कामातून होत आहे, असेही ते म्हणाले.

केंद्रीय राज्यमंत्री श्री. मोहोळ यांनी पुढे सांगितले, पुणे- लोणावळा तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गिकेचे कामही लवकरच सुरू होईल. त्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार प्रत्येकी २ हजार ५०० कोटी रुपये देणार असून त्यामुळे पुणे-मुंबई प्रवासातील वेळ तर कमी करण्यासाठी उपयुक्त होणार आहे. पुणे ते दिल्ली स्लीपर वंदे भारत ट्रेनबाबतही केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडे मागणी करण्यात आली आहे. पुणे रेल्वे स्थानकाची जागा अपुरी पडत असल्यामुळे पुढील काळात ऊरुळी कांचन येथे भव्य हार्बर टर्मिनल उभे करण्याबाबतचा आराखडा करण्यात आला असून लवकरच याबाबत कार्यवाही सुरू होईल, असेही ते म्हणाले.

मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील म्हणाले, ही रेल्वेच्या महाराष्ट्राच्या इतिहासात ऐतिहासिक घटना आहे. पुणे- कोल्हापूर आणि पुणे- हुबळी वंदे भारत ट्रेन मुळे पश्चिम महाराष्ट्रातील पुणे ते कोल्हापूर पट्ट्याला मोठा फायदा होणार आहे. या पट्ट्यात प्रचंड सहकारी चळवळ, उद्योग, शैक्षणिक संस्था असल्यामुळे एकाच दिवसात कोल्हापूरहून पुणे आणि पुण्याहून कोल्हापूर असे कामकाज करुन परत येणे शक्य होणार आहे. चांगला वेग, दिसायला आकर्षक, प्रवाशांना प्रवासाचा आनंद देणारी आणि उच्च दर्जाचे खाद्यपदार्थ असलेली ही रेल्वे आहे, असेही त्यांनी सांगितले.

# मी दिलेला सल्ला न ऐकल्यामुळे अरविंद केजरीवालांवर ही वेळ

## केजरीवालांच्या राजीनाम्यावर अण्णा हजारेंची प्रतिक्रिया





प्रतिनिधी
■ राळेगणसिद्धी

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. बाहेर आल्यावर केजरावाल यांनी रविवारी आपल्या राजीनाम्याची घोषणा केली. येत्या दोन दिवसांमध्ये मी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार असल्याचे केजरीवाल म्हणाले. केजरीवालांच्या राजीनाम्याने दिल्लीच्या राजकारणामध्ये खळबळ उडाली. केजरीवाल यांनी आगामी निवडणुकीमध्ये आपण मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार असल्याचंही सांगितलं. मात्र केजरीवालांनी निवडणुका डोळ्यासमोर ठेवत राजीनामा दिल्या असल्याची टीका विरोधक करत आहेत. अशातच यावर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

मी सुरूवातीलाचा अरविंद केजरीवाल यांना समाजसेवा करत राहा, राजकारणात जाऊ नका. भविष्यात मोठे माणूस होताल, असं सांगितलं होतं. आम्ही अनेक वर्षे सोबत राहिले आहोत. त्यावेळी मी त्यांना कायम सांगत होतो की राजकारणामध्ये न जाता समाजसेवा करा. समाजसेवा केल्याने खूप आनंद मिळतो. परंतु मी दिलेला सल्ला त्यांनी ऐकला नाही आणि आता या परिस्थितीला सामोर जावं लागत असल्याचं अण्णा हजारे यांनी म्हटलं आहे.

जेव्हा मी तुरुंगात होतो, तेव्हा भाजपच्या लोकांनी केजरीवाल यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा का दिला नाही, असे विचारले. मी तुम्हाला विचारण्यासाठी आलो आहे की तुम्ही केजरीवाल मानता का? जोपर्यंत जनता निर्णय देत नाही तोपर्यंत मी मुख्यमंत्रिपद स्वीकारणार नसल्याचं अरविंद केजरीवाल म्हणाले होते.

# राजश्री उंबरेंचं उपोषण स्थगित

## मराठा आंदोलनाचा शेवट गोड होणार

## मंत्री दीपक केसरकरांचं आश्वासन

प्रतिनिधी
■ छत्रपती संभाजीनगर

मराठा आरक्षण लढ्याचा शेवट गोड होणार असल्याचं आश्वासन शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिलं. मराठवाड्यात हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या मागणीसाठी राजश्री उंबरे या आंदोलक गेल्या 14 दिवसांपासून उपोषणाला बसल्या होत्या. सरकार तर्फे दीपक केसरकर आणि पालकमंत्री अब्दुल सत्तार यांचं शिष्टमंडळ चर्चेसाठी आलं. यावेळी "पुढील दोन आठवड्यात मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या मागण्या देखील अशाच असल्यानं त्यांना सोबत



घेऊन पुढील चर्चा करू. त्यासाठी दोन आठवडे लागणार आहेत," असं दीपक केसरकर यांनी सांगितलं. करण्यात आलेल्या मागण्यांपैकी बहुतांश मागण्या मान्य करण्याबाबत आश्वासन मिळाल्यानं उपोषण स्थगित करत असल्याचं राजश्री उंबरे यांनी घोषित केलं.

मराठवाड्यातील मराठा समाजाला न्याय देण्यासाठी हैदराबाद गॅझेट लागू करा, यासह इतर 21 मागण्यांसाठी धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानच्या प्रदेशाध्यक्षा राजश्री उंबरे यांनी उपोषण सुरू केलं होतं. निझामाच्या राजवटीत आरक्षणात असलेल्या समाजाला आज आंदोलन करावं लागत आहे. त्यामुळे मराठा समाजाला न्याय द्या, शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण द्या अशा मागण्यांसाठी 14 दिवसांपासून उपोषण सुरू करण्यात आलं होतं. दोन दिवसांपूर्वी आंदोलनकर्त्यांचं शिष्टमंडळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या यांच्या भेटीसाठी वर्षा बंगल्यावर गेलं. त्यावेळी सर्व मागण्यांबाबत चर्चा झाली, त्यानुसार राजश्री उंबरे यांच्याशी चर्चा करण्यासाठी शिष्टमंडळ रविवारी सायंकाळी शहरात दाखल झालं. शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर आणि अल्पसंख्यांक मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी मागण्यांबाबत चर्चा केली.

दीपक केसरकर यांनी सर्व मागण्या ऐकून घेतल्यानंतर यावर मुख्यमंत्री स्वतः आंदोलक मनोज जरांगे यांच्याशी चर्चा करणार असल्याचं सांगितलं. "मनोज जरांगे यांच्यामुळे हैदराबाद संस्थानात आणि इतर ठिकाणी असलेल्या नोंदी मिळाल्या आहेत.

# पद मिळाल्यावर माणसं बेताल होतात

## संजयकाका पाटील यांची खासदार विशाल पाटलांवर टीका

प्रतिनिधी
■ सांगली

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील राजकारणात मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. कुठे दावे-प्रतिदावे होत आहेत तर कुठे आरोप-प्रत्यारोप होताना दिसत आहेत. अशातच सांगली येथील भाजपचे माजी खासदार संजयकाका पाटील आणि विद्यमान खासदार विशाल पाटील यांच्यात शाब्दिक वार झाल्याचे समोर आले आहे.

पद मिळाल्यावर माणसे बेताल होतात, अशी टीका भाजपचे माजी खासदार संजयकाका पाटील यांनी विद्यमान खासदार विशाल पाटील यांच्यावर केली आहे. तसेच मी माझ्या कौशल्यावर, हिंमतीवर पदे मिळवलेली आहेत, असेही त्यांनी म्हणले आहे.

संजयकाका पाटील म्हणाले, अलीकडच्या काळात राजकीय जीवनामध्ये माणसाला पद, प्रतिष्ठा मिळाली की माणूस बेफाम होत चालला आहे. मिळालेले पद माझ्या कौशल्यावर, हिंमतीवर मिळवले असा भ्रम तयार होतोय, त्यामुळे माणसे बेताल होत आहेत. पण दिलेले पद लोकांनी कामासाठी दिलेले आहे याचा विसर पडतोय. याचे उदाहरण म्हणजे सांगलीचे नवनियुक्त खासदार आहेत, असे म्हणत खासदार विशाल पाटील यांच्यावर टीका केली आहे.


भायखळा येथील बापूराव जगताप मार्गावरील भायखळा पंचखाते सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ वर्ष ९३ वे श्रींची आकर्षक मूर्ती



अंधेरीचा वरदविनायक - सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, इंदिरा नगर आणि परिसर, भाई भगत मार्ग, अंधेरी पश्चिम



किरण कृष्णकांत सावंत, लालबाग यांच्या घरचा बाप्पा



श्री प्रियेश सकपाळ, काळाचौकी यांच्या घरी शाडूच्या मातीचे विराजमान गणपती बाप्पा


अंधेरीचा महासम्राट - श्री गणेश मित्र मंडळ सार्वजनिक गणेशोत्सव, गणेश नगर, एन दत्ता मार्ग, अंधेरी पश्चिम


नव तरुण सेवा मंडळ, सर्वात उंच मूर्ती, 'कालिनाचा इच्छापूर्ती गणेश'


आनंद नगर उत्सव समिती, सार्वजनिक गणेशोत्सव , दहिसर (पूर्व) वर्ष १४ वे

## रा.मि.म.संघाद्वारे गणरायांना निरोप!

**मुंबई:** राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष आमदार सचिनभाऊ अहिर यांच्या पुढाकाराने आणि सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीत सालाबादप्रमाणे यंदाही दि.१७ रोजी अनंतचतुर्दशी दिनी दुपारी २ वाजता भायखळा येथील खटाव मिल येथे गणरायांना निरोप देण्याचा समारंभ आयोजित करण्यात आलाआहे.भायखळा खटाव मिल कामगार आणि राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या स्वागत कक्षेत गणेश भक्तांसाठी पाणपोईची व्यवस्था करण्यात आली आहे.एनटीसीच्या पोदार मिल कामगार प्रतिनिधी आणि कार्यकर्तेही या कामी सहकार्याचा हात देणार आहेत.तेथे मिरवणूकीने येणारा "लालबागचा राजा" हा कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण ठरला असून,तेथ रा.मि.म. संघ आणि कामगारांच्या वतीने लालबागच्या राजावर पुष्पवृष्टी करण्यात येईल.संघटनेचे खजिनदार निवृत्ती देसाई, उपाध्यक्ष रघुनाथ आण्णा शिर्सेकर बजरंग चव्हाण,सुनिल अहिर, सुनिल बोरकर सेक्रेटरी शिवाजी काळे,मारुती शिंत्रे आदी उपस्थित राहून गणरायाच्या निरोप समारंभात सहभागी होतील.संघटनेचे अध्यक्ष,शिवसेनेचे उपनेते आमदार सचिनभाऊ अहिर गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे या प्रसंगी स्वागत करतील!






आरटीआय कार्यकर्ते मनोहर जरियाल यांच्या निवासस्थानी श्री गणेशाची मूर्ती स्थापित करण्यात आली आहे. मनोहर जरियाल यांची पत्नी आणि मुलगा प्रतीक है गणेशाच्या सेवेत असतात.



शिवनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ एन दत्तामार्ग, अंधेरी पश्चिम यांची २२ फूट उंच गणेश मूर्ती.



चिपळूण तालुक्यातील पिंपळी गावातील विठ्ठल पाचंगणे यांच्या घरातील गणराया.



अरविंद साटम यांच्या निवासस्थानी विराजमान श्री गणरायाची मूर्ती. अडवली, सिंधुदुर्ग

# भारत आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकीच्या फायनलमध्ये

## सेमीफायनलमध्ये दक्षिण कोरियाचा 4-1 असा पराभव केला, कर्णधार हरमनप्रीतने केले 2 गोल

वृत्तसंस्था
■ बीजिंग

भारत सहाव्यांदा आशियाई हॉकी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलमध्ये पोहोचला आहे. सोमवारी झालेल्या दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात गतविजेत्या भारताने दक्षिण कोरियाचा 4-1 असा पराभव केला. हा सामना चीनमधील हुलुनबुर येथील मोकी हॉकी प्रशिक्षण तळावर खेळला गेला. या स्पर्धेतील भारताचा हा सलग सहावा विजय आहे.

भारताकडून कर्णधार हरमनप्रीतने सर्वाधिक 2 गोल केले. त्यांच्याशिवाय उत्तम सिंग आणि जर्मनप्रीतने प्रत्येकी 1 गोल केला. दक्षिण कोरियाकडून यंग जी हुनने गोल केला. मैदानी गोलसाठी जर्मनप्रीतला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

मंगळवारी अंतिम फेरीत भारताचा सामना यजमान चीनशी होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी 3.30 वाजल्यापासून खेळवला जाईल. पहिल्या उपांत्य फेरीत चीनने पाकिस्तानचा पेनल्टी शूटआऊटमध्ये 2-0 असा पराभव केला.

पहिल्या क्वार्टरमध्ये भारत 1-0 ने आघाडीवर होता सामन्याच्या पहिल्याच मिनिटापासून भारताने कोरियावर दडपण आणले. कोरियाच्या डी वर भारताने एकामागून एक अनेक संधी निर्माण केल्या. क्वार्टरच्या 13व्या मिनिटाला उत्तम सिंगने गोल करत भारताला आघाडी मिळवून दिली. आरजीतसिंग हुंदलच्या असिस्टवर त्याने मैदानी गोल केला.



तत्पूर्वी, चौथ्या आणि पाचव्या मिनिटाला भारताने गोल करण्याच्या दोन संधी गमावल्या. येथे अभिषेकने प्रथम रिव्हर्स स्टिकने गोल करण्याचा प्रयत्न केला, मात्र कोरियाच्या गोलरक्षकाने अप्रतिम बचाव केला. यानंतर उत्तम सिंगने चेंडू डीच्या आत डिफ्लेक्ट करून राहिलला दिला, जो राहिलला गोलमध्ये बदलण्यात अपयश आले. या क्वार्टरमध्ये कोरियाला 2 पेनल्टी कॉर्नर मिळाले. ज्याचा फायदा संघाला करता आला नाही.

हाफ टाईमपूर्वी हरमनप्रीतचा गोल सामन्याच्या 19व्या मिनिटाला सरपंच साहेब म्हणून प्रसिद्ध असलेल्या भारतीय कर्णधार हरमनप्रीतने भारताच्या पहिल्या पेनल्टी कॉर्नरवर गोल केला. अभिषेकच्या इंजेक्शनमध्ये हरमनने थेट शॉट घेतला जो कोरियन बचावपटूपासून दूर आणि गोलमध्ये गेला. यानंतर 27व्या मिनिटाला भारताचा बचावपटू जर्मनप्रीत सिंगने सुखजीतला एरियल पास दिला. त्यामुळे या क्वार्टरनंतर सुखजीतला एकही गोल करता आला नाही.

बचावपटू जर्मनप्रीतचा मैदानी गोल तिसऱ्या क्वार्टरच्या सुरुवातीला भारतीय बचावपटूने आघाडी 3-0 अशी वाढवली. येथे जर्मनप्रीतने एकट्याने चेंडू पुढे आणला आणि डी बाहेरून मैदानी गोल केला. त्याने गोलच्या दिशेने वेगवान शॉट मारला जो कोरियन गोलरक्षक रोखू शकला नाही.

सामन्याच्या 33व्या मिनिटाला दक्षिण कोरियाने पुनरागमन केले. कोरियाचा ड्रॅगफ्लिकर यंग जी हुनने पेनल्टी कॉर्नरवर अप्रतिम गोल केला. यानंतर तिसऱ्या क्वार्टरच्या 46व्या मिनिटाला हरमनप्रीतने पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रुपांतर करत भारताला 4-1 अशी आघाडी मिळवून दिली.

भारताने 4-1 ने विजय मिळवला चौथ्या तिमाहीतही भारताने आक्रमण सुरूच ठेवले. या क्वार्टरमध्ये भारताला 3 संधी मिळाल्या, ज्यामध्ये त्याला एकही गोल करता आला नाही. सामन्याच्या 55 व्या मिनिटाला अभिषेकने गोलच्या दिशेने वेगवान शॉट खेळला. येथे कोरियन गोलकीपरने डायव्हिंग करताना शानदार सेव्ह केला. यानंतर 52 व्या मिनिटाला अमित रोहितदासला ग्रीन कार्ड मिळाले. भारताने 55व्या मिनिटाला मनप्रीतच्या फटक्याने आघाडी वाढवण्याचा प्रयत्न केला, पण कोरियाच्या बचावफळीने बचाव केला.

भारत हा सर्वात यशस्वी संघ आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी 13 वर्षांपूर्वी 2011 मध्ये सुरू झाली होती. भारतीय हॉकी संघ आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीचा गतविजेता आहे. भारताने चार वेळा तर पाकिस्तानने तीन वेळा विजेतेपद पटकावले आहे. तर 2021 मध्ये दक्षिण कोरियाने विजेतेपद पटकावले होते.

हिंदु जनजागृती समितीची बीसीसीआयकडे मागणी !

## बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचार थांबत नाही तोपर्यंत भारत-बांगलादेश सामने नको




प्रतिनिधी
■ मुंबई

आजही बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचार चालू असतांना बांगलादेश आणि भारत यांच्यात क्रिकेटचे सामने आयोजित करणे हा हिंदूच्या जखमेवर मीठ चोळण्याचा संतापजनक प्रकार आहे. जोपर्यंत बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचार थांबत नाहीत, तोपर्यंत भारत-बांगलादेश यांच्यातील सर्व क्रिकेट सामने आणि बांगलादेशी कलाकारांचे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात यावेत, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने 'भारतीय क्रिकेट नियामक मंडळा'कडे (BCCI) केली आहे. याविषयीचे निवेदन हिंदू जनजागृती समितीच्या वतीने 'भारतीय क्रिकेट नियामक मंडळ' (BCCI) येथील विशेष कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले, या वेळी हिंदू जनजागृती समितीचे अधिवक्ता अनीश परळकर, मानव सेवा प्रतिष्ठानचे विनायक शिंदे, धर्मप्रेमी अधिवक्ता राहुल पाटकर, रविंद्र दासारी, संदीप तुळसकर हे उपस्थित होते. या निवेदनाची प्रत देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी, केंद्रीय क्रीडामंत्री आणि परराष्ट्रमंत्री यांनाही देण्यात आली आहे.

या वेळी सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बांगलादेशसोबत भारताचे क्रिकेटचे दोन कसोटी सामने आणि तीन टी-20 सामने १९ सप्टेंबर ते १२ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत भारतात आयोजित करण्यात आले आहेत. हे क्रिकेट सामने चेन्नई, कानपूर, ग्वालियर, दिल्ली आणि हैदराबाद येथे होणार आहे. दुसरीकडे बांगलादेशातील हिंदू समाजावर सातत्याने हल्ले चालू आहेत. आतापर्यंत २३० लोकांचा मृत्यू झाला असून, बांगलादेशातील ६४ जिल्ह्यांपैकी ५२ जिल्ह्यांमध्ये हिंदूविरोधी हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत. शेख हसीना सरकारच्या राजीनाम्यानंत र हिंदूंच्या विरोधातील हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. विशेषत: ग्रामीण भागात हिंसाचार अधिक आहे, जिथे हिंदू समुदाय असुरक्षिततेच्या वातावरणात जीवन जगत आहे. नुकतीच उत्सव मंडल या तरुण हिंदु युवकाचे कथित ईशनिंदेच्या आरोपाखाली जिहादी जमावाने थेट पोलीस ठाण्यात घुसून त्या युवकाचे दोन्ही डोळे काढून चिरडले. अशा प्रकारे बांगलादेशात हिंदूवरील आक्रमणे करणे, त्यांच्या निर्घृण हत्या करणे हे राजरोसपणे चालू आहे.

## सुपर लीग कॅरम स्पर्धेत आनंदराव प्लॅटीनियम, आयडियलची विजयी सलामी

प्रतिनिधी
■ मुंबई

माजी केंद्रीय राज्य अर्थमंत्री आनंदराव अडसूळ वाढदिवस चषक शालेय-कॉलेज ज्युनियर खेळाडूंच्या सुपर लीग कॅरम स्पर्धेत आनंदराव प्लॅटीनियम, आयडियल चँम्पस संघांनी सलामीचे सामने जिंकले. आनंदराव प्लॅटीनियम संघाने अभिजित कॅप्टन्सीचा २-१ असा चुरशीचा पराभव करतांना भव्या सोळंकी व प्रसन्ना गोळे यांनी विजयी खेळ केला. आयडियल चँम्पसने साखळी २ गुण वसूल करतांना अटीतटीच्या लढतीत सुमती फायटर्सला २-१ असे नमविले. स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा पत्रकार सुनील सकपाळ, उद्योजक राजन राणे, प्रमुख पंच चंद्रकांत करंगुटकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.



आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी व सुमती सेवा मंडळ-दहिसरतर्फे को-ऑप. बँक एम्प्लॉईज युनियन, मुंबई व माहीम ज्युवेनील स्पोर्ट्स क्लब सहकार्याने माजी केंद्रीय राज्य अर्थमंत्री आनंदराव अडसूळ यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सुरु झालेले उद्घाटनीय सामने चुरशीचे झाले. अचूक फटके साधत विवा कॉलेज-विरारच्या भव्या सोळंकीने पाटकर विद्यालय-डोंबिवलीच्या अद्वैत पालांडेचा १९-० असा पराभव करून आनंदराव संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या सामन्यात पोद्दार अकॅडमीच्या पुष्कर गोळेने गौरांग मांजरेकरचा १५-० असा पराभव करून अभिजित संघाला १-१ अशी बरोबरी साधून दिली. तिसऱ्या निर्णायक सामन्यात प्रसन्ना गोळेने पार्ले टिळक विद्यालयाचा बलाढ्य कॅरमपटू सार्थक केरकरला १४-९ असे नमवून आनंदराव संघाच्या विजयावर २-१ असा शिक्कामोर्तब केला. आयडियल संघाला सुमती फायटर्सविरुध्द २-१ असा विजय मिळवून देतांना उमर पठाणने शेख अब्दुलला १७-० असे तर वेदांत पाटणकरने अवैस खानला १५-० असे हरविले. नील म्हात्रेने सुमती संघाला एकमात्र विजय मिळवून देतांना तृशांत कांबळीचा १७-३ असा पाडाव केला.

धारावी पुनर्विकासाचा 'श्री गणेश'

## सामाजिक उपक्रमांसाठी 250 सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना डीआरपीपीएलचा हातभार

प्रतिनिधी
■ मुंबई

गणेशोत्सव साजरा करतानाच विविध लोकोपयोगी उपक्रम राबविणाऱ्या धारावीतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना यंदा 'धारावी रिडेव्हलपमेंट प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड' (डीआरपीपीएल) ने मोठा हातभार लावला आहे. गणेशोत्सवादरम्यान विविध सामाजिक उपक्रम राबवण्यासाठी डीआरपीपीएलने धारावीतील सुमारे 250 सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना आर्थिक सहाय्य करत सामाजिक बांधिलकी जपली आहे.

धारावीतील सार्वजनिक गणेशोत्सवात धार्मिक कार्यक्रमांसोबतच मोठ्या प्रमाणात सामाजिक उपक्रम राबवण्याची परंपरा आहे. गणेशोत्सवाच्या दहा दिवसात विविध मंडळाकडून आरोग्य तपासणी शिबिर, मोफत नेत्रचिकित्सा, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर, विद्यार्थ्यांसाठी संस्कार वर्ग असे विविध उपक्रम राबवले जातात. या सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी यंदाच्या वर्षी डीआरपीपीएलने पुढाकार घेतला. स्थानिकांच्या हितासाठी राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमांतून जास्तीत जास्त धारावीकरांना लाभ मिळावा, या हेतूने सुमारे 250 सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना डीआरपीपीएलने आर्थिक सहाय्य करून मदतीचा हात दिला.

"युथ एंगेजमेंट प्रोग्रामच्या अंतर्गत धारावीतील लहान- मोठ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना आर्थिक सहाय्य करण्यात आले. यामुळे सामाजिक उपक्रम राबवण्यासाठी या मंडळांना मदत होऊ शकेल"अशा शब्दांत डीआरपीपीएलच्या प्रवक्त्यांनी प्रतिक्रिया दिली.याआधी देखील धारावीतील तरुणांसाठी डीआरपीपीएलने नेहमीच पुढाकार घेतला आहे. स्थानिक खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय टी-20 च्या धर्तीवर धारावी मध्ये टी - 10 क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. दहीहंडी मध्ये देखील 3000 हून अधिक गोविंदांना मोफत टी-शर्ट्स वितरित करण्यात आले. तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी गेल्या महिन्यात धारावीत पहिल्यांदाच भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

"गेल्या २० वर्षांपासून आम्ही मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा करतोय. या दहा दिवसांत मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. डीआरपीपीएलने केलेल्या आर्थिक सहाय्यामुळे या सामाजिक उपक्रमांना नक्कीच बळ मिळेल. लोकमान्य टिळकांनी समाजाला जागृत करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सवाची संकल्पना पुढे आणली. त्यांचाच आशीर्वाद घेऊन आम्ही देखील, सामाजिक भान जपणारे एक जबाबदार मंडळ म्हणून येत्या काळात प्रभावीपणे जनजागृती करून जनतेसमोर सत्य आणण्याचा प्रयत्न करू. धारावी पुनर्विकास प्रकल्प बाबतची सत्य माहिती जनतेसमोर आल्यास गैरसमज पसरणाऱ्या बाहेरच्या लोकांना जनताच धारावी बाहेर काढेल, याची आम्हाला खात्री आहे" अशा शब्दांत साई कृपा मित्र मंडळ सार्वजनिक गणेशोत्सवचे पदाधिकारी विनोद धोईफोडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

## लालबागच्या राजाचे विसर्जन एअरटेल एक्स्ट्रीम प्ले वर थेट लाईव्ह

Xstream Play

**मुंबई-** एअरटेल एक्सट्रीम प्लेच्या वापरकर्त्यांना देशभरात कुठूनही पूजनीय श्री लालबागच्या राजा चे विसर्जन थेट (लाईव्ह) पाहता येणार आहे. 7 सप्टेंबरपासून 10 दिवसांचा उत्सव चालू झाला आणि या उत्सवाचे थेट (लाईव्ह) प्रक्षेपण संपूर्ण भारतातील भाविक गण एअरटेल एक्स्ट्रीम प्ले वर पाहत (स्ट्रीम करत) आहेत. उद्या अनंत चतुर्दशी 17 सप्टेंबरला समुद्रात विसर्जनादरम्यान गणपती बाप्पाला निरोप देण्यासाठी वापरकर्त्यांना आता https://open.airtelxstream.in/SLBR वर फक्त क्लिक करून थेट (लाईव्ह) सहभागी होता येणार आहे. एअरटेल एक्स्ट्रीम प्ले वापरकर्ते ॲप किंवा वेबच्या माध्यमातून आपल्या मोबाइल, टॅब्लेट, लॅपटॉप अशा साधनांवर आणि मोठ्या स्क्रीनवर देशभरात कुठूनही या उत्सवाच्या समारंभात सहभाग घेऊ शकतात.

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता [शहर] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३९, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५४८४) हे जिल्हा उप निबंधक/शहर/मुंबई शहर जिल्हा यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकुण ०७ कामाकरीता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. विस्तृत निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळावर **https://mahatenders.gov.in** उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक १९.०९.२०२४ सकाळी १०.०५ पासून दिनांक २६.०९.२०२४ सायंकाळी ५.३५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (शहर), मुं.झो. सु. मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

**CPRO/A/700**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us: @mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता (शहर),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

**निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता ग-दक्षिण विभाग मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, ५ वा मजला, विश्वराजा दर्शन इमारतीच्या मागे, प्रभादेवी, मुंबई ४०००१३ हे म्हाडा/मुं.मनपा/सा. बां. विभाग/के. सा. बां. विभाग / रेल्वे/बीपीटी अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदारांकडून / सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांचे कडून एकूण ३ कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा (ऑफलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामांची यादी कार्यालयातील नोटीस बोर्डवर लावण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी |
| --- | --- | --- |
| १ | निविदा विक्री सुरु | २०/०९/२०२४ सकाळी ११.०० वाजता |
| २ | निविदा विक्री बंद | २७/०९/२०२४ दुपारी ०१.०० वाजता |
| ३ | निविदा स्विकृती | ३०/०९/२०२४ सकाळी ११.०० ते दु १.०० पर्यंत |
| ४ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | दिनांक ३०/०९/२०२४ दुपारी ३.०० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांना १ किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**CPRO/A/702**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us: @mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता
ग (दक्षिण विभाग)
मुं.इ.दु.व पु. मंडळ, मुंबई - १३



वरळीच्या कामगार विभागात सामाजिक चळवळीची प्रेरणा ठरलेला 'कस्तुरबा गांधी नगरचा राजा' कस्तुरबा नगरात भव्य-दिव्य राजमहालात विराजमान झाला आहे. या गणेशोत्सव मंडळाचे हे ६८ वे वर्ष असून नगरातील तिसऱ्या युवा पिढीने बाप्पाच्या सेवेची परंपरा अखंडितपणे सुरु ठेवली आहे. अध्यक्ष - अनिकेत कोरगावकर.



जय शिव सेवा मित्र मंडळ सार्वजनिक गणेशोत्सव (भाब्रेकर नगर मार्केट चा राजा)रौप्य महोत्सवी वर्ष सत्यनारायण महापूजा व भव्य महाप्रसाद भंडारा आयोजित केला होता. मंडळाचे अध्यक्ष संजय बिरादार सचिव मारोती बिरादार खजिनदार कृष्णा कुळे तसेच मंडळातील सर्व सभासद,महिला सभासद व सर्व तरुण मंडळीनी मोठ्या उत्साहाने बाप्पाचा महाप्रसाद वाटप केला.सर्व रहिवास्यांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



समाजसेवक शिवा सावंत यांच्या गुंदवली, अंधेरी (पूर्व) येथील निवासस्थानी विराजमान बाप्पा



आचरेकर कुटुंबीयांचा कणकवली करंजे गावी (सोनारवाडी ) विराजमान असलेला गणपती बाप्पा



पेडणेकर कुटुंबीयांचा मालवण देवबाग येथे विराजमान असलेला गणपती बाप्पा



गुणवंत कामगार',सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर पोळेकर यांच्या प्रभादेवीतील निवासस्थानी विराजमान बाप्पा



टेपव्हिलेज सार्वजनिक उत्सव मंडळ ,
अन्धेरी (प.) यांचा श्री गणराय, वर्ष ५० वे



अलिबाग- नागव पाल्हे येथील नामदेव शांताराम वाळंज यांच्या घरातील गणरायाची देखणी मूर्ती.



शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे उपविभाग प्रमुख महेंद्र पाटील यांच्या घरातील श्रींची मूर्ती. सोबत उपतालुकप्रमुख सुरेश रामभाऊ पाटील आणि सौ स्मिता सुरेश पाटील.



घाटकोपर भटवाडी येथील नामदेव मोहिते यांच्या घरी स्थापन झालेल्या श्री गणरायाची मूर्ती. सोबत मोहिते परिवार



अनिल मोरे आणि कुटुंबीय यांच्या शिवतर गावातील गणेशाची आकर्षक मूर्ती



अजय अप्पासाहेब कोते पाटील पानमळा, शिर्डी यांची गणेशाची आकर्षक मूर्ती



मरोळचा मोरया म्हणजे अंधेरी पूर्व येथील शिवगर्जना तरुण मित्र मंडळ यंदा ५७ वा श्री गणेशोत्सव साजरा करीत आहे. गणेशोत्सव काळामध्ये गणेशाचे आगमन ते विसर्जनापर्यंत आम्हा महिलांचा सहभाग लक्षणीय असतो. केवळ गणेशोत्सव साजरा न करता मंडळ विविध सामाजिक उपक्रम वर्षभर राबवत असते.
सौ. स्वाती संत (महिला प्रमुख, शिवगर्जना तरुण मित्र मंडळ)



गोपाळ रघुनाथ नाईक यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेला श्री गणेश मु. भटपावणी पो. आरोंदा ता. सावंतवाडी जि. सिंधुदुर्ग



ॲड. किरण पासवान यांच्या निवासस्थानी विराजमान बाप्पा



सखाराम ठकोरे (खारदेव नगर, घाटला गाव, चेंबूर) यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले गणपती बाप्पा



घाटकोपर पश्चिम जय संतोषी माता विकास मंडळाच्या गोळीबारच्या राजाची मंगलमूर्ती. यंदा मंडळाचे 44 वर्ष साजरे होत आहे.



न्यू दिंडोशी स्वामी समर्थ म्हाडा गणेशोत्सव मंडळाची सुंदर महालात विराजमान 12 इंचाची बाल गणेशमूर्ती. मूर्तिकार - श्रेयस सुथळे



डॉ. समीर भोर ,हेंद्रेपाडा ,बदलापूर यांच्या निवासस्थानी विराजमान श्री गणराय





